cmyk

## संपादकीय

### सावधानता हाच सर्वोत्तम उपाय !

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी मुंबई ऐवजी बॉम्बे नावाच्या वापराचे समर्थन केल्याने वाद निर्माण झाला आहे. चंदिगडप्रमाणे मुंबई ताब्यात घेण्याचा, महानगर प्रदेश शेजारील गुजरात राज्याला जोडण्याचा केंद्र सरकारचा डाव असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२१३ | रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### मुंबई–पुणे द्रुतगती महामार्ग दहा पदरी होणार

मुंबई : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) अखेर मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गाच्या दहापदरीकरणाचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविला असल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे १६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. महामार्गाचे दहापदरीकरण झाल्यास मुंबई पुणे प्रवास वाहतूक कोंडीमुक्त आणि अतिजलद होण्यास मदत होणार आहे. मुंबई – पुणे दरम्यानचा ९४.५ किमी लांबीचा द्रुतगती महामार्ग २००२ पासून वाहतूक सेवेत दाखल झाला. या महामार्गामुळे मुंबई – पुणे अंतर कमी झाले असून प्रवास अडीच तासात करणे शक्य होत आहे. राज्यातील सर्वात महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या या महामार्गावरून दररोज ६५ हजारांहून अधिक वाहने धावतात.

### थायलंडमध्ये भीषण पूर; १४५ जणांचा मृत्यू

बँकॉकः थायलंडमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली आहे. दक्षिण थायलंडमध्ये मृतांचा आकडा १४५ वर पोहोचला आहे, पुरामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. अधिकाऱ्यांनी म्हटले की पुराचे पाणी कमी होत असताना, विनाशाचे भयानक दृश्य समोर येत आहे. थायलंडच्या आपत्ती निवारण आणि व्यवस्थापन विभागाने शुक्रवारी सांगितले की, मुसळधार पावसामुळे दक्षिणेकडील १२ प्रांतांमध्ये पूर आला आहे, ज्यामुळे १२ लाखांहून अधिक कुटुंबं आणि ३६ लाख लोक प्रभावित झाले आहेत. बँकॉकमध्ये पत्रकार परिषदेत सरकारी प्रवक्ते सिरिपोंग अंगकासाकुल्कियात म्हणाले की, पुरामुळे आठ प्रांतांमध्ये १४५ जणांचा मृत्यू झाला आहे. सोंगखला प्रांताला सर्वाधिक फटका बसला आहे, ज्यामध्ये ११० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे.

### भारताला मिळणार आणखी एक 'ॲपल' हब

दिल्लीः 'ॲपल' कंपनी भारतातील ऑफलाइन रिटेल नेटवर्क वाढवण्यासाठी मोठे पाऊल टाकत आहे. एकापाठोपाठ नवीन ॲपल स्टोअर उघडत असलेल्या कंपनीकडून आता आणखी एका स्टोअरची घोषणा करण्यात आली आहे. डिसेंबर महिन्यात ॲपल देशात आपला पाचवा रिटेल स्टोअर सुरू करणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, ११ डिसेंबर २०२५ रोजी नोएडामध्ये नवीन ॲपल स्टोअर सुरु होणार असून हा ॲपल चा या वर्षातील तिसरा आणि देशातील पाचवा अधिकृत स्टोअर असेल. नवीन स्टोअर 'डीएलएफ मॉल ऑफ इंडिया', नोएडा येथे उघडले जाणार आहे. भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा स्मार्टफोन बाजार असल्याने ॲपल या बाजारपेठेत आक्रमक विस्तार धोरण राबवत आहे.

### राज्यावर चक्रीवादळाचे संकट

मुंबईः गेल्या तीन दिवसांपासून मुंबईतील तापमानात आणि सोबतच राज्यातील अनेक भागांतील तापमानात कमालीची वाढ झाली आहे. तर श्रीलंकेच्या किनाऱ्यावर आणि लगतच्या बंगालच्या उपसागरावर असलेल्या चक्रीवादळामुळे सध्या राज्यातील हवामानात वेगवेगळे बदल पाहायला मिळत आहेत. दिवसा ढगाळ वातावरण, मध्येच कधी तरी गरमी आणि त्यानंतर थंड हवा यामुळे सध्या लोकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम पाहायला मिळत आहे. अशातच आता पुढील २४ ते ४८ तासांत चक्रीवादळ भारतात धडकण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आल्याने याचा महाराष्ट्रावर परिणाम होऊ शकतो, असे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे.

# भारताच्या कांदा निर्यातीवर संकट !

## बळीराजा चिंतेत, केंद्राच्या धोरणाचा फटका

पुणे । प्रतिनिधी

**भारताच्या कांदा निर्यातीवर संकट आले आहे. एकेकाळी भारतीय कांद्याचे प्रमुख आयातदार असलेले बांगलादेश, सौदी अरब आणि फिलिपिन्स या देशांनी भारताकडून कांदा खरेदी करणे आता जवळपास थांबवले आहे. त्यामुळे भारताला मोठा फटका बसला आहे. गेल्या काही वर्षांत भारताने देशांतर्गत महागाई रोखण्यासाठी अनेक वेळा कांद्याच्या निर्यातीवर तात्पुरती बंदी घातली होती. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर याचा उलट परिणाम बघायला मिळाला. भारताच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आणि त्यामुळे आता आपल्या प्रमुख आयातदार देशांनी कांद्यासाठी अन्य पर्याय शोधला आहे. याचा परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे.**

कांद्याच्या बाबतीत बांगलादेश आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच गरज पडल्यास भारताऐवजी आणि पाकिस्तान आणि चीनसारख्या देशांकडून कांदा आयात करू लागला आहे. एकेकाळी भारताच्या कांद्याच्या निर्यातीपैकी जवळजवळ एक तृतीयांश कांद्याची खरेदी करणारा बांगलादेश गेल्या आठ



महिन्यांत खूपच कमी आयात करत आहे. बांगलादेशच्या बाजारपेठेतील किमती भारतापेक्षा तिप्पट जास्त असूनही बांगलादेशने भारताकडून कांदा आयात करण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी केले आहे. माहितीनुसार, २०२३–२४ मध्ये भारताने बांगलादेशला ७.२४ लाख टन कांदे निर्यात केले, जे एकूण निर्यातीच्या ४२% होते. परंतु, एप्रिल–सप्टेंबर २०२५–२६ मध्ये हे प्रमाण फक्त १२,९०० टनांवर घसरले. हीच परिस्थिती सौदी अरेबियाच्या बाबतीत आहे, सौदीनेही मागील एक वर्षापासून भारतीय कांदे खरेदी करणे जवळपास बंद केले आहे. त्यांचे म्हणणे आहे की त्यांना येमेन आणि इराणकडून स्वस्त पर्याय मिळत आहे आणि स्थानिक उत्पादन पुरेसे आहे. दुसरीकडे निर्यातदारांचे म्हणणे आहे ▶▶ पान २ वर

# ऊस आंदोलन प्रकरणाच्या गुन्ह्यांतून राजू शेट्टींसह ८० जणांची निर्दोष मुक्तता

कोल्हापूर । प्रतनिधी

जिल्ह्यातील शिरोली येथे राष्ट्रीय महामार्गावर २०१२ मध्ये जे ऊस आंदोलन झाले होते; त्यात एका पोलिसाचा मृत्यू झाला होता. या गुन्ह्यांतून माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांच्यासह ८० जणांची निर्दोष मुक्तता झाली आहे. या ऊस आंदोलनाच्या जवळपास १५ वर्षांनंतर या खटल्याचा निकाल लागला आहे.

ऊस आंदोलन प्रकरणी नोंदवलेल्या गुन्ह्यांत ३०२ सारखा कलमांचा समावेश होता. या गुन्ह्यातून सर्वच्या सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. यामुळे राजू शेट्टी यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जवळपास १३ वर्षांनी हा निकाल लागल्याने आंदोलनातील शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या आवारातच एकमेकांची



गळाभेट घेत आनंद व्यक्त केला. यावेळी बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, शेतकरी आंदोलने करत असताना आंदोलन दडपण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने पोलिस प्रशासनास हाताशी धरून जाणीवपूर्वक हा गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता झाल्याने चळवळीमध्ये लढण्यासाठी कार्यकर्त्यांना पुन्हा बारा हत्तीचे बळ आले आहे. शेतकरी हा न्याय हक्कासाठी ▶▶ पान २ वर

# राहुल गांधींविरुद्ध लावलेली सीडी निघाली रिकामी

## मानहानी प्रकरणाच्या सुनावणीला नाट्यमय वळण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील एमपीएमएलए विशेष न्यायालयात राहुल गांधींविरोधातील मानहानी प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान नाट्यमय घटना घडली. सावरकर यांच्या कथित अपमानासंदर्भातील या प्रकरणात मुख्य पुरावा म्हणून सादर करण्यात आलेली सीलबंद सीडी न्यायालयात चालवली असता ती पूर्णपणे रिकामी निघाली. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अनपेक्षित संभ्रम निर्माण झाला असून तक्रारदारांच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

हा खटला सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी दाखल केला आहे. त्यांनी आरोप केला आहे की राहुल गांधींनी २०२३



मध्ये लंडनमध्ये दिलेल्या भाषणात सावरकरांचा अवमान करणारी टिप्पणी केली होती. या दाव्याचा मुख्य आधार म्हणजे भाषणाची ती सीलबंद सीडी. मात्र, तीच सीडी न्यायालयात चालवताना त्यात डेटा नसल्याचे उघड झाले. सात्यकी सावरकर यांच्या वतीने हजर असलेले वकील संग्राम कोल्हटकर यांनी सांगितले की हीच सीडी पूर्वी न्यायालयाला दाखवण्यात आली होती आणि त्याच आधारे राहुल गांधींना समन्स दिला होता. त्यामुळे सीडी अचानक रिकामी कशी झाली, हा गंभीर प्रश्न त्यांनी उपस्थित केला. न्यायालयात काही क्षणांसाठी शाब्दिक गोंधळ निर्माण झाला आणि संपूर्ण प्रक्रिया संशयास्पद असल्याची शंका आली. सीडी रिकामी निघाल्यानंतर तक्रारदारांनी न्यायालयाला हा व्हिडिओ थेट यूट्यूबवरून पाहण्याची परवानगी मागितली. परंतु राहुल गांधींचे वकील मिलिंद पवार यांनी त्या विनंतीला कडाडून ▶▶ पान २ वर

# आ.धस यांच्यापासून माझ्या जीवाला धोका; ॲड.असीम सरोदे यांचा दावा

पुणे । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते राम खाडे यांच्यावर बुधवारी रात्री जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली. १० ते १५ जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला आहे. या घटनेनंतर राम खाडे यांच्या पत्नी तुळसा खाडे यांनी प्रतिक्रिया दिली. आमदार सुरेश धस यांनीच हल्ला**



**घडवून आणल्याचा थेट आरोप राम खाडे यांच्या पत्नीने केला होता. त्यानंतर, आता आमदार सुरेश धस यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचा दावा पुण्यातील नावाजलेले वकील ॲड. असीम सरोदे यांनी केला आहे. धस यांच्या समर्थकांनी ज्या खाडे नावाच्या व्यक्तीला मारहाण केली, त्या व्यक्तीच्या नातेवाईकांकडून आपल्याला ही माहिती मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.**

आष्टी तालुक्यातील राम खाडे हे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी आहेत, गेल्या ▶▶ पान २ वर

# उद्या बीडमध्ये मुख्यमंत्र्यांची सभा



बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी (दि.१) बीड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांच्या सभेसाठी शहरातील माने कॉम्प्लेक्स येथील मैदानाची साफसफाई सुरू आहे. भाजपकडून सभेसाठी जय्यत तयारी करण्यात येत आहे. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्या प्रचारार्थ ही विजय संकल्प सभा होणार आहे. या सभेला पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह आमदार, वरिष्ठ नेते व पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर व शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी दिली.

गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता असून सर्वत्र विकासकेंद्री राजकारणाला प्राधान्य दिले जात आहे. बीड शहरासाठीही विकासकेंद्री व्हिजन मांडण्यात आले असून दिलेला शब्द पाळण्याची ताकद भाजपमध्ये आहे. त्यामुळे बीडकरांनी भाजपवर विश्वास ठेवावा ▶▶ पान २ वर

# केजजवळ एसपींच्या गाडीचा अपघात

बीड प्रतिनिधी

**बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या गाडीचा अपघात झाल्याची घटना शनिवारी पहाटे ३.३० च्या सुमारास घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. केजजवळ एका पोलवर गाडी धडकल्याने अपघात झाल्याचे सांगण्यात आले.**



पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत परळीच्या विद्यानगर भागात गोळीबार झाल्यामुळे तातडीने गेले होते. रात्री उशिरा परळीवरून परत येताना गाडी वेगात असल्याने केजजवळ एका पोलवर धडकली. यावेळी कारमधील सर्वांनी सीट बेल्ट लावल्यामुळे मोठा अनर्थ टळला. या अपघातात गाडीचे काही नुकसान झाले असून, कोणतीही जीवितहानी मात्र झाली नाही. यावेळी पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्यासोबत ▶▶ पान २ वर

# 'डिटवाह'मुळे ढगाळ हवामानाचा अंदाज राज्यातील तापमानात चढ उतार सुरुच

पुणे । प्रतिनिधी

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या डिटवाह चक्रीवादळामुळे राज्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह तूरळक पावसाची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील किमान तापमानात चढ उतार सुरु आहेत.

श्रीलंकेच्या किनारपट्टी आणि बंगालच्या उपसागरात तयार झालेले डिटवाह चक्रीवादळ भारताच्या किनारपट्टीच्या दिशेने वाटचाल करत आहे. हे चक्रीवादळ कराईकलपासून १९० किलोमीटर आग्नेयला, पुद्दुचेरीपासून ३०० किलोमीटर दक्षिण आग्नेयला, चन्नईपासून ४०० किलोमीटर दक्षिणेला आहे. हे चक्रीवादळ उत्तर वायव्येकडे वाटचाल करण्याची शक्यता आहे. तसेच उद्या सकाळपर्यंत हे चक्रीवादळ बंगालच्या उपसागरात वायव्येला उत्तर तमिळनाडू, पद्दुचेरी आणि लगच्या दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर येण्याची शक्यता आहे. डिटवाह चक्रीवादळाच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४.५० क्विंटल | २,५४१ | ३,०२१ | २,७५१ |
| ज्वारी/हायब्रिड : ६.५० क्विंटल | २,६०० | ३,२०० | २,८३० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १९.०० क्विंटल | ३,००० | ५,३५१ | ४,५९२ |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,६०० | ३,२९८ | २,९४४ |
| मुग: २.५० क्विंटल | ६,८०१ | ७,२०१ | ७,००१ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

# उपमुख्यमंत्री अजित पवार अचानक मस्साजोगमध्ये दाखल

## स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची घेतली भेट

केज । प्रतनिधी

तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाले. शनिवारी त्यांच्या वर्ष श्राद्धाचा कार्यक्रम होता. बीड जिल्हा दौऱ्यावर असलेले अजित पवार यांनी माजलगाव येथील कार्यक्रम आटोपल्यानंतर हॅलिकॅप्टरकडे जाण्याऐवजी थेट मस्साजोगमध्ये जाऊन स्व.संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.



बीड जिल्ह्यामध्ये सहा नगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. शनिवारी बीड, माजलगाव, धारूर या ठिकाणी त्यांच्या नियोजित ▶▶ पान २ वर

# सबकुछ देवाभाऊ, नंबर दोनला काही किंमत नसते

## रवींद्र चव्हाण यांनी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डिवचले

विटा । प्रतिनिधी

**बाबांनो, नंबर एक हा नंबर एकच असतो, नंबर दोन ला काहीही किंमत नसते, असे तुमच्याच भागातील ज्येष्ठ नेते दिवंगत आर. आर. पाटील यांनी भर विधिमंडळात सांगितले होते, अशा शब्दांत भाजपचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पुन्हा एकदा शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डिवचले आहे.**

विट्यात भाजपाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रतिभाताई चोथे यांच्यासह २६



भाजप उमेदवारांची प्रचार सभा झाली. यावेळी माजी मंत्री आमदार सुरेश खाडे, माजी आमदार सदाशिवराव पाटील, ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड, माजी नगराध्यक्ष वैभव पाटील, पक्षाचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, प्रतिभाताई पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे शिवाजी शिंदे, आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी रवींद्र चव्हाण म्हणाले, एकनाथ शिंदे यांची सभा येथे झाली. त्या सभेमध्ये काय बोलले गेले कसे बोलले गेले याची माहिती मिळाली. मला दोन गोष्टी सांगायच्या आहेत. मला २०१४ सालची गोष्ट आठवते. आम्ही आमचे सरकार आल्यामुळे आनंदात होतो. विधानसभेच्या सभागृहातला पहिलाच दिवस तिथे या भागातले नेतृत्व जे आता हयात नाहीत. आर. आर. आबा पाटील बोलत होते. कदाचित त्यांचे ते शेवटचं भाषण असावे त्यानंतर ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बॉम्बे नाही मुंबईच !

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी मुंबई ऐवजी बॉम्बे नावाच्या वापराचे समर्थन केल्याने वाद निर्माण झाला आहे. चंदिगडप्रमाणे मुंबई ताब्यात घेण्याचा, महानगर प्रदेश शेजारील गुजरात राज्याला जोडण्याचा केंद्र सरकारचा डाव असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला. ठाकरे यांच्या आरोपानंतर बॉम्बे आणि मुंबईच्या वादावरून राजकारण सुरू होताच मुंबईतील बॉम्बेच्या खुणा संपल्याच पाहिजेत अशी राज्य सरकारची भूमिका असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

पूर्वी बॉम्बे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईचे १९९५ मध्ये राज्य सरकारने मुंबादेवीच्या सन्मानार्थ आणि ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा ठसा पुसण्यासाठी अधिकृतपणे मुंबई असे नामकरण केले. मात्र तरीही आयआयटी बॉम्बेचे नाव बदलले नाही. हा विषय केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्या विधानामुळे पेटला. मंत्री सिंह यांनी आयआयटी बॉम्बेला भेट देऊन त्या नावावर भाष्य केले. आयआयटी बॉम्बेबद्दल सांगायचे तर, सुदैवाने या संस्थेचे नाव तेच आहे. तुम्ही ते बदलून मुंबई केले नाही याचा आनंद आहे. आयआयटी मद्रासचेही तेच नाव अजूनही आहे असे सिंह म्हणाले. यावर मनसे प्रमुख राज ठाकरे म्हणाले, मराठी नेत्यांनी आणि जनतेने नेहमीच मराठी लोकांची असलेली मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा कट उधळून लावला आहे. आपली मराठी मुंबई महाराष्ट्रातच राहिली. त्यांच्या मनात अनेक दशकांपासून असलेली कटुता आता पुन्हा बाहेर येत आहे. मुंबई हे नाव सत्ताधारी पक्षाला त्रास देते. कारण ते मुंबईच्या मुंबादेवीच्या नावावरून ठेवले आहे. केंद्र सरकारने चंदिगड पंजाबच्या ताब्यातून हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला परंतु इतर सर्व पक्षांच्या विरोधानंतर ते मागे हटले. माघार तात्पुरती होती. मुंबईबाबतही असेच काहीतरी घडत आहे. शहरावर कब्जा करण्याचा प्रयत्न निश्चितपणे होत आहे. प्रथम मुंबई आणि नंतर महानगर प्रदेश ताब्यात घेतला जाईल आणि गुजरातमध्ये विलीन केला जाईल म्हणून मराठी लोकांनी जागे व्हावे असे राज ठाकरे म्हणाले. मुंबई महापालिका निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच आयआयटी बॉम्बे नावावरून वाद उफाळून आला आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या वक्तव्यावरून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजपला लक्ष्य केले असून मराठी माणसाने सावध व्हावे, असे आवाहन केले आहे. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज ठाकरेंवर पलटवार करताना बॉम्बेचे मुंबई करण्यात भाजपचा मोठा वाटा असल्याचे स्पष्ट केले. आमच्याकरिता बॉम्बे नाही, तर मुंबईच आहे. असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

लोकसभेत मुंबई हेच नाव अधिकृत नाव म्हणून शिक्कामोर्तब झाल्यानंतर मुंबईत येऊन एखादा केंद्रीय मंत्री आपल्याला बॉम्बे हेच नाव आवडते असे सांगून एखाद्या संस्थेच्या नावात बॉम्बे नाव कायम ठेवल्याबद्दल आनंद व्यक्त करत असेल तर केंद्रीय मंत्री लोकसभेचा आणि केंद्र सरकारचा उपमर्द करत आहेत असा त्याचा अर्थ होत नाही का? केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातील राजकारण तापले, बॉम्बे विरुद्ध मुंबई हा वाद वाढला. मनसेकडून रात्री मुंबई आयआयटीच्या गेटसमोर आयआयटी बॉम्बे नाही, आयआयटी मुंबई असे बॅनर लावण्यात आले. केंद्रीय मंत्र्यांवर टीका करताना राज ठाकरे म्हणाले, खरे पाहता जितेंद्र सिंह यांचा मुंबईशी काही संबंध नाही, ना गुजरातशी. ते निवडून येतात जम्मूमधून. पण आपल्या शीर्ष नेतृत्वाच्या मनात काय चालले आहे ते ओळखून, तसे बोलून शाबासकी मिळवणे हाच त्यांचा उद्देश आहे. बॉम्बेचे नामकरण मुंबई असे होऊन अनेक वर्षे झाली पण राजकीय नेत्यांपासून ते कलाकारांपर्यंत अनेकजण मुंबईचा उल्लेख आजही बॉम्बे असाच करतात. मुंबईचे जुने नाव बॉम्बे असे होते. ब्रिटिशांच्या राजवटीत हे नाव अधिक प्रचलित झाले. १६ व्या शतकात जेव्हा पोर्तुगीजांनी येथे सत्ता मिळवली तेव्हा त्यांनी हे नाव वापरायला सुरुवात केली. सुमारे ३०० वर्षांहून अधिक काळ जगभरात हे शहर बॉम्बे म्हणून ओळखले जात होते. त्या काळात हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र आणि बंदर म्हणून विकसित झाले. शिवसेनेने नाव बदलासाठी जोरदार मोहीम चालवली होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी गेट वे ऑफ इंडियावर मुंबई असा बोर्ड लावून प्रत्यक्ष पाऊलही उचलले होते. मात्र तत्कालीन केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय ओळख कमी होईल या भीतीने बराच काळ नाव बदलाला मंजुरी दिली नव्हती. पण स्थानिकांसाठी हा बदल फारसा महत्त्वाचा नव्हता. कारण मराठी आणि गुजराती भाषिक शहराला आधीपासूनच मुंबई म्हणत होते. मुंबईच्या धर्तीवर देशातील इतर शहरांची नावेही बदलण्यास प्रारंभ झाला होता. १९९६ मध्ये मद्रासचे चेन्नई झाले. त्यामागे तमिळ भाषा आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा हेतू होता. म्हणजेच शहराचे नाव बदलण्यामागे त्या शहराच्या ओळखीचा, संस्कृतीचा आणि इतिहासाचा मोठा प्रवास दडला आहे. कोणी काहीही बरळले तरी मराठी माणसांनी मुंबईचे अस्तित्व जपण्यासाठी सदैव जागृत राहिले पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात मुंबईसाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे हे विसरून चालणार नाही.

# राहुल गुरखुदे यांची प्रचारात आघाडी

**बीड । प्रतिनिधी**



**बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये प्रभाग आठ मधील भाजपचे उमेदवार राहुल गोपाल बुरकुटे व संध्या राजपूत यांना मोठा प्रतिसाद मिळत असून कुरकुरे यांचे मित्रपरिवार प्रचाराला लागला आहे**

बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपाने प्रचारात मोठी आघाडी घेतली असून बीड शहरातील अनेक भागांमध्ये भाजप मोठ्या फरकाने आघाडीवर आहे शहरातील प्रभाग आठ मध्ये राहुल गोपाल गुरखुदे व संध्या राजपूत यांनी आघाडी घेतली असून मतदाराकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे त्यांनी या प्रभागात घेतलेल्या आघाडीमुळे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारालाही मताधिक्य मिळण्याची शक्यता आहे.

# महाराणी ताराबाई विद्यालयात संविधान सप्ताह व महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे तथा महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागाचे महासंचालक मा.सुनील वारे, सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव डॉ.हर्षदीप कांबळे,बार्टी विभाग प्रमुख डॉ.बबन जोगदंड, समतादूत जिल्हा प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान सप्ताहाचे आयोजन महाराष्ट्र राज्यामध्ये करण्यात आले आहे.**

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता- ०९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधाना विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने संविधान सप्ताह अंतर्गत संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा परीक्षा दि. २८/११/२०२५ शुक्रवार रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या श्रीमती एस.के.आंधळे-डोईफोडे तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून जिल्हा प्रकल्प समतादूत महादेव तुरे सर तसेच उपप्राचार्य मस्के सर,प्रा.मुंडे सी.व्ही., प्रा.कांबळे, प्रा.संजय केदार,प्राध्यापिका कचरे मॅडम मान्यवर म्हणून उपस्थित होते. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथीनिमित्त व भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्राचार्या श्रीमती एस.के.आंधळे-डोईफोडे यांच्या हस्ते हार,पुष्प वाहून अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. बीड जिल्हा प्रकल्प समतादूत महादेव तुरे



सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानासाठी दिलेले योगदान तसेच क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य व भारताचे संविधान उद्देशिका,बार्टी संस्थेचे विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच अध्यक्षीय विचार प्राचार्या आंधळे मॅडम यांनी व्यक्त करून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील सर यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्राध्यापिका कचरे मॅडम यांनी मानले. त्यानंतर विद्यालयातील इयत्ता नवी ते बारावी च्या विद्यार्थ्यामध्ये संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २५ प्रश्नांची ५० गुणांची ऑफलाइन परीक्षा घेण्यात आली. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा परीक्षेत सहभाग घेतला हा कार्यक्रम व परीक्षा घेण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये स्वीप अंतर्गत मतदान जनजागृती



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये २९ नोव्हेंबर रोजी स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम व नॅशनल सायबर सेक्युरिटी दिन निमित्ताने कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आला. त्यांनी एनसीसी, एनएसएस व विद्यार्थ्यांना सार्वत्रिक निवडणूक नगरपालिका २०२५ निमित्ताने सर्व मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केले व घटनेने मिळालेल्या हक्कानुसार योग्य उमेदवार निवडून द्यावा असे आवाहन केले. तसेच याप्रसंगी नॅशनल सायबर सिक्युरिटी दिनानिमित्ताने सायबर सुरक्षितताव प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून दिली तसेच सायबर फसवणुकीमुळे कोणत्याही आमिषाला बळी न पडता सायबर फसवणुकीपासून दूर राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना मतदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे. तसेच सायबर सिक्युरिटी आत्मसात करून कोणत्याही भुलथापन बळी न पडण्याचे आवाहन केले. यावेळी विचार मंचावर उपप्राचार्य प्राध्यापक महादेव रोकडे उपप्राचार्य मेजर डॉक्टर मिलिंद गायकवाड पर्यवेक्षक प्राध्यापक सच्चिदानंद ढेपे यांची उपस्थिती होती कार्यक्रमासाठी रासेयो स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मेजर उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड यांनी मानले.

# नवीन विद्युत सहाय्यक मुळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**कडा । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे ग्रामस्थांच्या वतीने नव्याने रूजू झालेल्या विद्युत सहाय्यक (वायरमन) रामहरी साहेब मुळे यांचा आज उत्स्फूर्त वातावरणात सत्कार करण्यात आला.**

गावाच्या विकासात, वीज व्यवस्थापनात आणि ग्रामस्थांच्या दैनंदिन गरजांमध्ये वायरमनची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्या पार्श्वभूमीवर सुलेमान देवळा गावामध्ये रामहरी साहेब मुळे यांची नियुक्ती होताच ग्रामस्थांमध्ये आनंद व समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात बोलताना अनेक मान्यवरांनी सांगितले की रामहरी साहेब मुळे हे कार्यतत्पर, शांत स्वभावाचे आणि लोकाभिमुख वृत्तीचे आहेत. त्यांच्या येण्याने गावातील वीजसंबंधित कामे अधिक वेगाने, तत्परतेने आणि समाधानपूर्वक मार्गी लागतील, असा आमचा विश्वास आहे. तसेच ग्रामस्थांनी



सांगितले की गावातील छोट्या-मोठ्या वीज तक्रारी, मेंटेनन्सची कामे तसेच आकस्मिक तांत्रिक अडचणी यावर तत्काळ प्रतिसाद देऊन सेवा देणारा कर्मचारी मिळणे ही गावासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे.'' या प्रसंगी गावातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, महिला मंडळ, युवक मंडळ तसेच ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने सांगितले की रामहरी साहेब मुळे यांच्यासारखे सेवाभावी कर्मचारी गावाची उन्नती, सुरक्षितता आणि विकासासाठी नेहमीच बळ देणारे ठरतात. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या भावी कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# 'प्रिय नदीस' ठरला सर्वोत्कृष्ट लघूचित्रपट

## सिने अवार्ड पुणे चा दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

**पूणे येथे नुकत्याच पार पडलेल्या सिने अवार्डा ॲकाडमी पूणे - २०२५ व युवा महाराष्ट्र फाऊंडेशन यांच्या वतीने भास्कर शिंदे फिल्म प्रॉडक्शन निर्मित व लेखक आर. प्रकाश यांनी लिहलेल्या 'प्रिय नदीस' या लघुपटाने बाजी मारत आर्ट फिल्म (कलात्मक विभाग) या गटातुन प्रथम क्रमांकाचा ''दादासाहेब फाळके पुरस्कार'' पुरस्कार मिळवला.**

यावेळी सामाजिक क्षेत्र व सिने क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते 'प्रिय नदीस' च्या सर्व टिमचा सन्मान करण्यात आला. या यशासाठी माजलगाव विधानसभा सदस्य आमदार प्रकाश सोळंके यांनी सर्व टिमला आपल्या निवासस्थानी बोलवुन त्यांचा विशेष सत्कार केला व आपल्या शुभेच्छापर भाषणात आमदार प्रकाश सोळंके बोलताना म्हणाले की, 'प्रिय नदीस' ची संपूर्ण टिम माजलगावच्या मातीतली असल्यामुळे मी खूप भारावुन गेलो आहे. ''प्रिय नदीस'' लघुपटाच्या यशाबद्दल त्यांनी निर्माते भास्कर शिंदे व दिग्दर्शक विष्णू उगले यांचे विशेष कौतुक करुन बाल कलाकार प्रसेनजित शिंदे यांच्याही पाठीवर त्यांनी कौतुकाची थाप मारली. या लघुपटाचे छायाचित्रण व संकलन अमर देवणे यांनी केले आहे तर चि.प्रसनजित शिंदे,ॲड.पुजा देडे, बद्रीनाथ खंडागळे,भिमराव घोडेराव आदी कलावंतानी काम केले आहे. तसेच तांत्रिक बाजू सुभाष कांबळे,सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी सांभाळली आहे.



सामाजिक वास्तव आणि भावनिक किनार असणाऱ्या 'प्रिय नदीस' ने प्रेक्षकांबरोबरच समीक्षकांचीही दाद मिळवली आहे. या पुरस्कारामुळे मराठवाड्यातील ग्रामीण चित्रपटाची प्रतिष्ठा हळूहळू वाढत असल्याचे आशादायक चित्र निर्माण होत आहे. माजलगाव सारख्या ग्रामीण भागात बनलेल्या 'प्रिय नदीस' ने आम्हाला खूपच सन्मान मिळवीन दिला आहे यात शंका नाही.त्यामुळे जिम्मेदारी वाढलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुन्हा एकदा एका वेगळ्या विषयावरील फिल्मचे काम प्रगतीपथावर आहे.

पान १ वरून...

### भारताच्या कांदा निर्यातीवर संकट !

की, भारतीय कांद्याच्या बियाण्यांच्या बेकायदेशीर वाहतुकीमुळेही परिस्थिती बिकट झाली आहे. या बियाण्यांचा वापर करून, पारंपारिक खरेदीदार देश आता स्वतःचे कांद्याचे उत्पादन वाढवत आहेत. पूर्वी, ग्राहकांना दर्जेदार वस्तूंसाठी जास्त पैसे मोजावे लागत होते, परंतु जेव्हा आम्ही बराच काळ बाजारातून बाहेर होतो तेव्हा त्यांना नवीन स्रोत सापडले. भारताने ऑगस्ट २०२३ ते एप्रिल २०२५ पर्यंत अनेक वेळा कांदा निर्यातीवर निर्बंध लादले. यामुळे भारतीय कांद्यावर अवलंबून असलेल्या देशांमध्ये किमती वाढल्या. त्याचा फटका भारताला आत्ता बसताना दिसतो आहे.

-----------

### राहुल गांधींविरुद्ध लावलेली

विरोध केला. त्यांनी सांगितले की ऑनलाईन उपलब्ध कंटेंट न्यायालयात दाखवण्यासाठी भारतीय अधिनियमाच्या कलम ६५-नुसार आवश्यक प्रमाणपत्र लागते ते तुमच्याकडे नाही. न्यायालयानेही त्यांचा युक्तिवाद मान्य केला आणि लिंक दाखवण्यास नकार दिला. याच दरम्यान तक्रारदारांनी दोन अतिरिक्त सीडी पुरावा म्हणून दाखल करण्याची विनंती केली, मात्र न्यायालयाने स्पष्ट केले की नोंदीत अशा सीडी अस्तित्वातच नाहीत; त्यामुळे ती मागणीही नामंजूर करण्यात आली. रिकामी सीडी नेमकी कधी, कशी आणि का रिकामी झाली? पूर्वी ज्यावरून कोर्टाने समंन्स पाठवला तीच सीडी आता रिकामी कशी काय निघाली? हे गंभीर प्रश्न उभे करत तक्रारदारांच्या वकिलांनी न्यायालयीन चौकशीची मागणी केली. पवार यांनी त्यास विरोध केला तरी शेवटी न्यायालयाने सुनावणी शुक्रवारपर्यंत तहकूब केली.

-----------

### ऊस आंदोलन प्रकरणाच्या गुन्ह्यांतून

आणि घामाच्या दामासाठी संघर्ष करत होता आणि तो यापुढेही लढतच राहील, अशी भावना राजू शेट्टी यांनी व्यक्त केली. जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश कश्यप यांनी सर्वांची निर्दोष सुटका केली. ॲड. शास्त्री, श्रेणीक पाटील, सुवर्ण पाटील, तनिष्क जाधव यांनी यासाठी मेहनत घेतली. शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्यासाठी गुन्हे दाखल केल्याचा दावा करण्यात आला. माजी आमदार उल्हास पाटील, जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सावकार मादनाईक यांचाही आरोपीत समावेश होतो.

------------

### उद्या बीडमध्ये मुख्यमंत्र्यांची

आणि शहराच्या अधिकाधिक विकासाची संधी सुज्ञपणे साधावी, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले. शहरातील भाजप जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात शनिवारी (दि.२९) बीड शहरासाठी विकासाभिमुख संकल्पपत्र अर्थात जाहीरनाम्याचे अनावरण जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, प्रा.देविदास नागरगोजे, चंद्रकांत फड, जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, ज्येष्ठ नेते विजय पालसिंगणकर, इर्शाद शेख, संग्राम बांगर, ॲड.संगीता धसे, सुनील मिसाळ, गणेश लांडे, बालाजी पवार, जयश्री मुंडे, संध्या राजपूत, भाग्यश्री मुंडे, शैलाताई मुसळे, डॉ.लक्ष्मण जाधव, भूषण पवार, डॉ.अभय वनवे, डॉ. रमेश शिंदे, अक्षय रणखांब, अशोक इंगळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### आ.धस यांच्यापासून माझ्या जीवाला

५ वर्षांपासून माझे आणि त्यांचे संबंध आहेत. देवस्थानच्या जमिनीच्या संदर्भातील भ्रष्टाचार त्यांनी कागदपत्रांच्या आधारे माझ्या लक्षात आणून दिला, तसेच वेगवेगळ्या ठिकाणी तक्रारी दिल्या होत्या. पोलिसांकडेही तशा तक्रारी दिल्या होत्या. राम खाडे यांच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. त्यानंतर, ते माझ्याकडे आले असता, तब्बल १००० कोटींचा आर्थिक गैरव्यवहार आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून झालेला आहे. देवस्थानच्या जमिनी त्यांनी स्वत:च्या खासगी लोकांच्या नावाने त्यांनी करुन घेतल्या आहेत. त्यामध्ये, प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांना मदत केल्याचे दिसून आले. यासंदर्भात मुंबईतील ईडीच्या कार्यालयात तक्रार दाखल केली. मात्र, ईडीनेही भाजप आमदार असल्याने कदाचित त्यांच्यावर कुठलीही कारवाई केली नाही. पोलिसांनीही दखल घेतली नाही. अखेर संभाजीनगरच्या उच्च न्यायालयात खाडे यांनी धाव घेतली. त्यानंतर, उच्च न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, कुणालाही पोलिसांकडून अटक करण्यात आली नाही. राम खाडे यांनी विविध विभागात अर्ज करुन, नेत्यांना भेटून स्वत:साठी संरक्षण मिळवले. मात्र, ते संरक्षण काढून घेण्यात आले. राम खाडे यांच्यावर निर्घृणपणे हल्ला करण्यात आल्याची माहिती मिळाली. याशिवाय, माझ्या देखील जीवाला धोका असल्याचे असीम सरोदे यांनी सांगितले. राम खाडेंसारख्या व्यक्तीचे संरक्षण झाले पाहिजे, अशी भावनाही सरोदे यांनी व्यक्त केली.

------------

### 'डिटवाह'मुळे ढगाळ हवामानाचा अंदाज

प्रभावाने राज्यातील काही भागात ढगाळ हवामानासह अगदी तूरळक पावसाची शक्यता आहे. यामुळे राज्यातील किमान तापमानात चढ उतार सुरु आहेत. आज जेऊल येथे राज्यातील निचांकी ९.५ अंशाची नोंद झाली होती. उत्तर महाराष्ट्रासह इतर काही भागात तापमानात घट दिसून आली. विदर्भातही काही भागात तापमानात घट झाली होती. तर राज्यातील काही भागात तापमानातील वाढ कायम आहे. पुढील काही दिवस तापमानातील चढ उतार कायम राहतील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला.

---------

### केजजवळ एसपींच्या गाडीचा

आरटीपीसी गणेश थापाडे, चालक राहेकोल आणि क्यूआरटीचे पथक देखील सोबत होते. दरम्यान. आपण सुखरूप असल्याचे नवनीत कॉवत यांनी सांगितले आहे.

------------

### सबकुछ देवाभाऊ, नंबर

ते आजारी पडले. मात्र त्या दिवशी माजी आमदार सदाशिवराव पाटील त्या सभागृहात उपस्थित होते. आर आर आबांनी सांगितले, काँग्रेस राष्ट्रवादीच्या पक्षामध्ये राहुल मी अनेक मंत्रीपदे भूषवली. परंतु मी फार प्रयत्न केला नंबर एक व्हायचा परंतू मी काही नंबर एक होऊ शकलो नाही. बाबांनो तुम्हाला म्हणून सांगतो नंबर एक हा नंबर एकच असतो. नंबर दोन ला काहीही किंमत नसते. असे ते म्हणाले मी म्हणत नाही. माझ्यावर नाही, किमान त्यांच्यावर तरी विश्वास ठेवा. देवा शपथ मी हे म्हणत नाही अशी पुष्टी जोडत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीररित्या डिवचले आहे.

------------

### उपमुख्यमंत्री अजित पवार

सभा होत्या. मात्र यातच संतोष देशमुख यांचा वर्ष श्रद्धाचा कार्यक्रम असल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यांनी एका कार्यक्रमांकडून दुसऱ्या कार्यक्रमाकडे जात असताना अचानक आपला ताफा मस्साजोगच्या दिशेने वळवला. त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे म्हणजे त्यांचा भाऊ धनंजय देशमुख व त्यांच्या कन्या वैभवी देशमुख यांची भेट घेऊन सांत्वन केले . संतोष देशमुख यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाले. अद्यापही या प्रकरणाचा निकाल लागलेला नाही. वर्ष श्राद्धाचा कार्यक्रम असल्याने मराठा योद्धा मनोज जरांगे, आमदार सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित, आमदार संदीप क्षीरसागर, खासदार बजरंग सोनवणे, शिवसेनेचे अनिल जगताप, सचिन मुळक यांनी भेट देऊन सांत्वन केले.

## थोडक्यात



### पाटोदा येथे संविधान दिन उत्साहात साजरा

पाटोदा : २६ नोव्हेंबर रोजी पाटोदा शहरात संविधान दिन मोठ्या उत्साहात व राष्ट्रीय अभिमानाने साजरा करण्यात आला. विविध शाळा, शासकीय कार्यालये तसेच सामाजिक संस्थांच्या पुढाकाराने जनजागृती उपक्रम, प्रभात फेरी, संविधान वाचन आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून झाली. विद्यार्थ्यांनी संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि भारतीय लोकशाहीची मूल्ये यावर आकर्षक फलक व घोषवाक्यांच्या माध्यमातून संदेश दिला. स्थानिक प्रशासनाच्या वतीने अधिकारी आणि मान्यवरांनी संविधानाचे महत्त्व, त्यातील तत्त्वज्ञान आणि नागरिकांनी पाळावयाच्या कर्तव्यांबद्दल मार्गदर्शन केले. शाळांमध्ये विशेष निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा तसेच कायदेविषयक जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संविधान दिनानिमित्त घेतलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये लोकशाही मूल्यांविषयी जागृती निर्माण होऊन संविधानाबद्दलचा अभिमान अधिक दृढ झाल्याचे प्रतिपादन आयोजकांनी केले. यावेळी साहित्यरत्न प्रतिष्ठान पाटोदा यांच्या वतीने संविधानाची उद्देशिकेची प्रत वाटप करण्यात आल्या.

### आमच्या लोकनेत्यांवर कोणतेही खोटे आरोप खपवून घेतले जाणार नाहीत –नगराध्यक्ष जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर हल्ला झालेल्या घटनेचा सर्वत्र निषेध केला जात आहे. हल्लेखोरांचा शोध घेऊन कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी पाटोदा नगरपंचायत चे नगराध्यक्ष राजू (भैय्या) जाधव यांनी केली आहे. मात्र या घटनेचा गैरफायदा घेऊन काही जणांकडून लोकनेते सुरेश (आण्णा) धस यांच्यावर विनाकारण आरोप लावले जात असल्याने नगराध्यक्ष राजू भैया जाधव यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली.

नगराध्यक्ष म्हणाले, राम खाडे प्रकरणात आमच्या लोकनेते सुरेश (आण्णा) धस यांचे नाव डागाळण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे आरोप पूर्णपणे खोटे, निराधार आणि राजकीय हेतूने पसरवले गेले आहेत. लोकसेवा व विकासासाठी आयुष्य घालवलेल्या नेत्यावर अशा आरोपांची छाया देखील येऊ देणार नाही. यापुढे ते म्हणाले, आमच्या लोकनेत्यांवर कोणतेही खोटे आरोप खपवून घेतले जाणार नाहीत. आमची राजकीय संस्कृती शांतता, विकास आणि परस्पर सन्मानाची आहे. हिंसाचाराला प्रोत्साहन देणे किंवा वैयक्तिक वैर बाळगणे हा आमचा मार्ग नाही, आणि भविष्यातही नसेल. जनतेमध्ये काही व्यक्तींनी मुद्दाम अफवा पसरवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत त्यांनी स्पष्ट केले की, अशा अफवांना बळी पडू नका. सत्य लवकरच समोर येईल. नगराध्यक्ष राजू भैया जाधव यांनी प्रशासनाला योग्य ती कारवाई करण्याचे आवाहन करत निषेध नोंदवला.

### सुनीता भिलेगावकर यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मंगलनाथ कॉलनीतील रहिवासी असलेल्या सुनिता रंगराव भिलेगावकर यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी पहाटे निधन झाले.



शहरातील मंगलनाथ कॉलनी येथील रहिवासी असणाऱ्या सुनीता रंगराव भिलेगावकर या नवविकास मंडळ शिक्षण संस्थेच्या सभासद म्हणून सर्वपरिचित होत्या त्याचबरोबर सन्मित्र महिला मंडळ मंगलनाथ महिला मंडळ यांच्यामध्येही सक्रिय सभासद म्हणून त्यांची ओळख होती विविध सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्या मितभाषी म्हणून त्या सर्वांना परिचित होत्या गेल्या काही दिवसापासून प्रकृती अस्वस्थमुळे त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या वेळी त्यांची उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली त्यांच्या पश्चात पती रंगराव भिलेगावकर मुलगा इंदिरेस भिलेगावकर दोन मुली नातवंडे असा परिवार आहे.

# स्वच्छ, सुंदर व आरोग्ययुक्त माजलगावसाठी भाजपा हाच एकमेव पर्याय – डॉ.ओमप्रकाश शेटे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव सारख्या सुसंस्कृत व प्रगतशील शहराला स्वच्छ, सुंदर व आरोगयुक्त बनवायचे असेल तर भारतीय जनता पार्टी हाच एकमेव पर्याय असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केले. नगरपालिका निवडणूक प्रचारादरम्यान डॉ. शेटे यांनी शहरातील विविध भागात कॉर्नर बैठका व जाहीर सभांचा धडाका लावला आहे. तसेच त्यांनी घराघरात जाऊन भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजय करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळत असून त्यामुळे भाजपाचे पारडे जड झाले असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य पसरले आहे.



माजलगाव नगरपालिका निवडणुकीला रंग चढू लागला असून प्रचारयुद्धात राजकीय तापमान वाढत आहे. भारतीय जनता पार्टी कडून डॉ. ओमप्रकाश शेटे हे तीन – चार दिवसांपासून भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. दमदार आणि लोकाभिमुख शैलीत ते मतदारांशी संवाद साधत असून त्यांचे प्रचारात उपस्थित राहणे हे राजकीय समीकरणांवर थेट परिणाम घडवणारे ठरत असल्याचे दिसून येत आहे. डॉ. शेटे यांच्या झंजावाती प्रचारामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले असून भाजपाने प्रचारात आघाडी घेतली आहे.केंद्रात व राज्यात भा.ज.पा.चे सरकार आहे, त्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर नगरपालिकेत सुद्धा त्याच पक्षाची सत्ता असणे क्रमप्राप्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख योजना राबविण्यात आल्या आहेत. विद्यार्थी, तरुण, महिला व वृद्धांच्या प्रगतीसाठी सरकारने पुढाकार घेतला आहे. शहराला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर भाजपाचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी निवडून द्या असे आवाहन शेटे यांनी केले. शेतकरी, कष्टकरी, नोकरदार, शहरी व ग्रामीण असा भेदभाव न करता सबका साथ सबका विकास हे ब्रीद घेऊन देवाभाऊ काम करत आहेत. त्यांचे हात बळकट करण्यासाठी व सर्वांगीण विकास साधण्यासाठी शहरवासीयांनी पुढे येऊन भाजपच्या सर्व उमेदवारांना मतदान केले पाहिजे असेही ते म्हणाले. माजलगाव हे शहर प्रगतशील व सुसंस्कृत आहे. मात्र मागच्या काळात भ्रष्ट राजकारण्यांनी शहराला बकाल केले आहे. धरण उशाला व कोरड घशाला अशी लोकांची अवस्था आहे. आठ आठ दिवस नळाला पाणी येत नाही. शहरात कचऱ्यांचे प्रचंड ढीग लागले आहेत. नाल्या तुंबल्यामुळे रस्त्यावर चालणे सुद्धा मुश्किल होत आहे. गल्लीबोळात वागण्यायोग्य रस्ते नाहीत. प्रचंड घाणीचे साम्राज्य असल्यामुळे साथीच्या रोगाने लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत स्वच्छ, सुंदर व आरोग्ययुक्त माजलगाव साठी भाजपा हाच एकमेव पर्याय असल्यामुळे मतदारांनी भाजपचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी करावेत असे आवाहन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी माजलगावकरांना केले आहे.

## संविधानाने समाजात मानवी मूल्यांची पेरणी केली - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील महात्मा फुले स्मारक समिती, अंबाजोगाई तर्फे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.





यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, संविधान विषयाच्या व्याख्याता प्रा.शैलजा बरूळे, रिपाइं आठवले गटाचे नेते मा.महेंद्र निकाळजे, समिती सचिव रत्नदीप गोरे, उपाध्यक्ष प्रा.अनिल नरसिंगे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व संविधानाच्या प्रास्ताविक वाचनाने करण्यात आली. यावेळी बोलताना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी संविधानाने मानवी मूल्यांना बळकटी दिली आहे. प्रत्येक नागरिकास त्याचे हक्क अधिकार आणि कर्तव्य याची जाणीव करून देण्यात आलेली आहे. संविधानाने सर्वसामान्य माणसाला सत्तेचा केंद्रबिंदू बनविला आणि आपल्या जीवनात आचरण कसे असावे हे शिकवले आहे हे संविधान लिहीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना तब्बल तीन वर्षांचा कालावधी लागला या कालावधीमध्ये त्यांनी भारताला महासत्ता बनविण्याचा महामार्ग बनवला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखित या संविधानामुळे भारतामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता हे मूल्य रूजविली गेली आणि भारतामध्ये मानवी मूल्य पेरली गेली. भारतामध्ये अनेक जाती, पंथ, धर्म, भाषा, प्रांत असताना भारत एकसंघ आहे. याचं कारण, फक्त आणि फक्त संविधान आहे असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले. संविधान विषयाच्या व्याख्यात्या बरूळे यांनी भारतीय संविधान जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे व भारतीय संविधानाचे संदर्भ घेऊन अनेक राष्ट्रीय त्यांचा राज्य कारभार त्या पद्धतीने चालवतात या शब्दांत संविधानाचे महत्त्व विशद केले. संविधानाने सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्याची प्रेरणा दिली मानवी अधिकारांची आणि कर्तव्यांचे महत्त्व समजावून सांगितले आणि याद्वारे राष्ट्राची एकात्मता कशी अबाधित राहील याकडे संविधानाने विशेष लक्ष दिले असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.मिलिंद ढगे यांनी मानले. यावेळी संविधान दिनानिमित्त संविधानावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली होती यामधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी प्रा.सुनील नरसिंगे, विजय कचरे, संजयभाऊ साळवे, रामेश्वर खाडे, भाऊराव गवळी, प्रा.बि.के.मसने, प्रा.अनंत कांबळे, बालाजी भदरगे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### ऊस दरवाढीच्या आंदोलनाला

बहुमत्ताने पाठिंबा जाहीर करते.

म्हणूनच आपण या गंभीर आणि तातडीच्या प्रश्नावर त्वरित मध्यस्थी करून शेतकऱ्यांच्या मागण्या निकाली काढाव्यात अशी विनंती ग्रामपंचायत सोन्नाथडी यांनी दि २९ रोजी येथील उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे निवेदनावर गावातील मुंबई बाजार समितीचे सभापती तथा सोसायटीचे व्ह .चेरमन अशोक आबा डक, सरपंच विनय भैया डक, अशाबाई वाघमारे ,बंडू शिंदे,जयश्री गोटे,अशामती पवार,उर्मिला डक,भगवान कांबळे ,पांडुरंग वक्ते संतोष देशमुख ,रघुनाथ डाके ,गिन्यांनदेव वाघमारे ,जाकिराम पवार,महादेव डाके,ज्ञानोबा पवार,महादेव डाके,विष्णूपंत गोरे,अशोक शिंदे ,पांडुरंग पावर व वैजनाथ पवार आदी सह गावातील नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

### गेवराईकर जनता

शहरातील प्रमुख मार्गावर रॅली काढण्यात आली. याप्रसंगी ॲड.चंद्रकांत नवले यांनी गेवराईकरांशी संवाद साधत शिवसेनेच्या नगराध्यक्षांसह नगरसेवक पदाच्या उमेदवारांना आपल्या सेवेची संधी द्यावी, शिवसेना शहराचा चेहरामोहरा बदलून विकास करेल असा विश्वास व्यक्त केला. या पदयात्रेला गेवराई शहरवासियांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

### सीसीआय कापूस खरेदीत

सीसीआय केंद्रांवर देखरेख वाढवून शेतकऱ्यांना अनावश्यक अडवणूक रोखावी, गुणवत्तेनुसार दर कपात केल्यास त्याची कारणमीमांसा लेखी स्वरूपात शेतकऱ्यांना द्यावी, ऑनलाइन नोंदणी, स्लॉट बुकिंग, तोलमापन व बिलिंग प्रक्रियेत तांत्रिक कारणे दाखवत होणारा त्रास तातडीने थांबवावा, शेतकऱ्यांसाठी शेड, पिण्याचे पाणी, बसण्याची सोय, स्वतंत्र रांगा अशा मूलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात. दैनंदिन खरेदीचे निरीक्षण अहवाल जिल्हास्तरावर पुनरावलोकनासाठी सादर करावेत. शेतकऱ्यांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाहीसाठी विशेष पथक नियुक्त करावे. या मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन आवश्यक कार्यवाही केली जाईल, अशी अपेक्षा अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि खरेदी प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व न्याय्य पद्धतीने राबवावी, अशी मागणी या निवेदनातून पुढे आली आहे.

### भाववाढीच्या मागणीसाठी

उचल दिली जाते. मग बीड जिल्ह्यातील कारखाने आणि गूळ पावडर युनिट्स शेतकऱ्यांना कमी भाव का देत आहेत? ''पश्चिम महाराष्ट्रात ऊसापासून साखर होते, मग आपल्या ऊसाचं काय मीठ होतं का?'' असा संतप्त सवाल भाई थावरे यांनी केला आहे.

या सर्व प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा भाई थावरे यांनी दिला आहे. संबंधित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आनंदगाव, लोणगाव येथील शेतकरी दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत 'अन्नत्याग आंदोलन' करणार असल्याची माहिती भाई थावरे यांनी दिली

### परळी पोलिसांनी चोरीला

नागरिकांनी समाधान व्यक्त केले. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल मोबाईल मालकांनी त्यांचे आभारही व्यक्त केले. परळी शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व सायबर डेस्कचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक अमर शिंगणे यांनी मोबाईल हरवल्यानंतर तक्रारीसाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटरमण, परळी शहर चे प्रभारी अधिकारी नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर डेस्कचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक अमोल शिंगणे व पोलीस आमदार प्रशांत शेळके यांनी केली.

### खंडोबा यात्रेनिमित्त

सदस्य तसेच गावकऱ्यांनी एकत्रितपणे उत्कृष्ट व्यवस्थापन करत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. परिसरातील अनेक भाविक भक्तांनी यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली, तर कुस्तीप्रेमींनी जंगी कुस्त्यांचा मनसोक्त आनंद घेतला.यावेळी झालेल्या कुस्ती दंगालीत शेवटच्या कुस्तीचे बक्षीस ₹५००१ इतके ठेवण्यात आले होते. अंतिम कुस्ती ही चिंचला गावचे नसीर शेख आणि अलीम पटेल यांच्या दरम्यान झाली. शेवटच्या फेरीला मोठा उत्साह आणि प्रेक्षकांची गर्दी पाहायला मिळाली.खंडोबा यात्रेच्या निमित्ताने झालेले हे कुस्ती आयोजन गावाच्या परंपरेची आणि क्रीडा संस्कृतीची जपणूक करणारे ठरले.

### गांधी महाविद्यालयाच्या

झाल्याने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. या निमित्ताने सरपंच संदीप खकाळ, अजित डिसले, जितेंद्र बनकर, बंडु जाधव, बिबीषन पोकळे, बाबासाहेब पोकळे, संदीप जाधव, विक्रम नरवडे, बाळू पोकळे, उद्धव पोकळे, शिवम पोकळे, क्रीडा शिक्षक जमीर सय्यद, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सदस्य, संचालक मंडळ, प्राचार्य, सर्व स्टाफ, विद्यार्थी व पालक यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.

## अभ्यासामुळेच समाजात प्रतिष्ठा मिळते -प्रा. सुरज छनवाल

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त स्पर्धा परीक्षेवर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे प्रमुख पाहुणे म्हणून प्रहार अकॅडमी चे संचालक प्राध्यापक सुरज छनवाल प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम समन्वयक प्राचार्य डॉ सुनील जाधव माजी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे स्पर्धा परीक्षा केंद्राच्या संचालक प्राध्यापक डॉ कल्पना घारगे उपस्थित होत्या सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रस्ताविक स्पर्धा परीक्षेच्या संचालिका सौ प्राध्यापक डॉ कल्पना घारगे यांनी केले महाविद्यालयात या केंद्राच्या माध्यमातून येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली यानंतर प्रमुख पाहुणे प्रहार अकॅडमी अहिल्यानगर येथील संचालक प्राध्यापक सुरज छनवाल सर यांनी मार्गदर्शन करीत असताना जर विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी आपण भरपूर अभ्यास करून समाजात प्रतिष्ठा मिळवता येते अशी आव्हान केली विविध परीक्षेवर त्यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप प्राध्यापक डॉ सुनील जाधव सर यांनी केला त्यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयातील विविध उपक्रमाची माहिती देऊन या परिसराचे महाविद्यालय स्पर्धा परीक्षेचे केंद्र झाले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक डॉ लोखंडे बी बी यांनी मानले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ विभाग प्रमुख प्राध्यापक सतीश जरागे प्राध्यापक प्रकाश नाईकवाडे डॉ शिवाजीराव काकडे प्राध्यापक पापाजी चव्हाण प्राध्यापक नारायण फुने डॉ जाहीद सिद्दीकी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्टीच्या वतीने संविधान सप्ताह उत्साहात साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

संविधान सप्ताहाच्या निमित्ताने बार्टीच्या वतीने प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल, वडवणी येथे विविध उपक्रमांचे आयोजन करून दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिकरीत्या संविधान उद्देशिकेचे वाचन केले. विद्यार्थ्यांना संविधान विषयक मार्गदर्शन देत मूलभूत मूल्यांची ओळख करून देण्यात आली.

पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठी 'सापशिडीचा खेळ' तसेच संविधानातील मूल्यांवरील विशेष बॅनरच्या माध्यमातून मूलभूत अधिकार, कर्तव्ये, कलमे आणि संविधानाचा उपयोग याबाबत माहिती देण्यात आली. मुलं आणि मुलींसाठी दोन स्वतंत्र रांगा तयार करून त्यांना क्रमांकानुसार संविधानातील विविध मूल्यांची ओळख करून देण्यात आली. संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना लवकरच पारितोषिके देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रभर राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी बार्टी पुणेचे महासंचालक माननीय सुनील वारे साहेब, सचिव डॉ. हर्षदीप कांबळे साहेब, विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड साहेब, तसेच जिल्हा प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे साहेब यांचे मार्गदर्शन लाभले. वडवणी तालुक्यातील समतादूत महादेव तुरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लाटणे .., पर्यवेक्षक श्रीमती कुरकुटे .., श्रीमती तांबडे .., सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती चव्हाण .., तसेच शिक्षिका श्रीमती उपरे .., श्रीमती आबूज .., श्रीमती बडे .., श्रीमती दिवटे .., श्रीमती केदार .., श्रीमती टिपरे .., श्रीमती गवळी .., श्रीमती चव्हाण .. उपस्थित होत्या. कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकशिक्षिकांचे आभार समतादूत महादेव तुरे यांनी मानले.

# दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार किंवा शोषण करणे हा कायद्यान्वये गुन्हा आहे -राजेंद्र लाड

आष्टी । प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसा व शोषणाविरोधात दिव्यांग कल्याण विभागाने राज्यभर एकसमान कार्यपद्धती लागू केली आहे. जिल्हास्तरावर उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांनी तक्रारींची नोंद घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आता दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार किंवा शोषण झाल्यास आरोपींना थेट सहा महिने ते पाच वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. अशी माहिती दिव्यांग हितार्थ शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी दिली आहे.



दिव्यांग व्यक्ती असुरक्षित आणि इतरांवर अवलंबून असल्याने अत्याचार आणि हिंसाचाराच्या बळी ठरल्या आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या सर्व प्रकारच्या छळ, हिंसाचार आणि शोषणापासून संरक्षण देण्यासाठी उपाययोजना शासन करील. तसेच कलम ७ (१) (अ) नुसार शासन अशा घटनांची दखल घेईल आणि अशा घटनांच्या विरोधात कायदेशीर उपाय उपलब्ध करतील, असा नियम आहे. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणारा छळ, हिंसाचार आणि शोषणाविरुद्ध प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. सदर कार्यवाहीची प्रक्रिया दिव्यांग व्यक्ती हक्क नियमांतर्गत निश्चित करण्यात आली आहे. शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा कठोर निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार, शोषण झाल्यास आरोपींना थेट ६ महिने ते ५ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

दिव्यांग व्यक्तीविरोधी छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांची दखल घेण्यासाठी, कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी काम पाहतील. पीडितांना वाचवणे, संरक्षण आणि पुनर्वसन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे काम सक्षम प्राधिकारी करतील. सदरील निर्णय हा दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचा हक्क देणारे ऐतिहासिक पाऊल आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही एकसमान कार्यपद्धती लागू झाल्यामुळे प्रशासकीय जबाबदारी वाढेल आणि दिव्यांगांना तातडीने न्याय मिळेल. दिव्यांगाच्याबाबत घडलेल्या छळ, हिंसाचार यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर सक्षम प्राधिकारी फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम १३३ ते १४३ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १५२ ते १६२) नुसार त्वरित कार्यवाही करतील. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार अनुपालन न केल्यास भारतीय दंड संहितेच्या, कलम १८८ (भारतीय न्याय संहिता, कलम २२३) नुसार शिक्षेस पात्र असतील. पीडित दिव्यांग व्यक्ती, त्यांचे नातेवाईक, पोलिस किंवा कोणतीही स्वयंसेवी संस्था तक्रार दाखल करू शकते. तक्रार पोलिस ठाण्यात दाखल होताच ती तातडीने जिल्हा किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे वर्ग केली जाईल. विशेष म्हणजे, दंडाधिकारी स्वतःहूनसुद्धा अशा घटनांची दखल घेऊन कारवाई करू शकतात. असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी सांगितले आहे.

## दिद्रूड येथे महिलांनी केला संविधान दिन साजरा




माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिदृड येथे संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचनदेखील करण्यात आले.त्यानंतर शहरातील मुख्य ठिकाणावरून संविधानाच्या प्रतिमेची मिरवणूक काढत संविधानिक मूल्यच्या घोषणा देत राजरत्न बौध्द विहार याठिकाणी सांगता करण्यात आली यावेळी आयु सजीवणी बाबासाहेब देशमाने, कु. शिवानी ज्ञानोबा देशमाने, आयु. रिठा सिद्धार्थ मायदळे, आयु सुनीता बालासाहेब देशमाने, आयु मीरा संभाजी देशमाने, आयु मुक्ता अर्जुन मायदळे, आयु सुशीला अर्जुन देशमाने, जनाबाई चांदमारे,आयु मदाकिनी दिनेश देशमाने, आयु प्रभावती देशमाने, आयु इंदुबाई ज्ञानोबा देशमाने,सुनीता विठ्ठल देशमाने,आयु प्रेरणा सचिन देशमाने, कु नंदनी संजय देशमाने, कु दिक्षा बाबासाहेब देशमाने, कार्यक्रम यशस्वी केला,तसेंच वंचित बहुजन आघाडीचे तालुका संघटक रामकुमार बप्पा देशमाने यांनी ह्या सर्व कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# गहू, हरभरा व कांदा पीक विमा योजनेचा हप्ता भरण्यासाठी अंतिम मुदत

पुणे : रब्बी हंगामातील पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ज्वारी उत्पादकांना शेवटचे दोन दिवस उरले आहेत. आत्तापर्यंत राज्यात सुमारे सव्वा तीन लाखांहून अधिक अर्ज आले आहेत. गेल्या वर्षी हाच आकडा ५५ लाख इतका होता. गहू, हरभरा व कांदा पिकासाठी १५ डिसेंबरची मुदत असल्याने सहभागी शेतकरी अर्जाची संख्या वाढेल, अशी आशा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.अर्ज केलेल्या शेतकऱ्यांमध्ये लातूर विभागाने आघाडी घेतली असून या विभागात आतापर्यंत १ लाख ३६ हजार शेतकरी अर्ज संख्या आहे तर संभाजीनगर विभागात ७८ हजार शेतकऱ्यांचे अर्ज आले आहेत. केंद्र सरकारने रब्बी हंगामातील ज्वारी गहूहरभरा कांदा भात आणि उन्हाळी भुईमूग या सहा पिकांसाठी विमा योजना जाहीर केली आहे. ज्वारी पिकासाठी विमा उतरवण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर आहे. त्यामुळे सहभागासाठी शेवटचे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. तर गहू हरभरा व कांदा पिकासाठी ही मुदत १५ डिसेंबर अशी आहे. उन्हाळी भात व भुईमूग पिकासाठी अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ अशी ठेवण्यात आली आहे. राज्यात आतापर्यंत १ लाख ६५ हजार ११ शेतकऱ्यांनी ३ लाख २६ हजार १६८ अर्ज केले आहेत. या अर्जानुसार २ लाख ६ हजार ९९५ हेक्टरवरील पिकांचा विमा उतरविण्यात आला आहे. गेल्या वर्षी या योजनेत २८ लाख ५३ हजार ४९९ शेतकऱ्यांनी ५५ लाख १७ हजार ८१४ अर्ज आले होते. रब्बी हंगामात सबंध राज्यभर गहू व हरभरा या दोन पिकांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असते तसेच ओलिताची सोय असलेल्या जिल्ह्यांमध्ये कांद्याचे क्षेत्रही मोठे असते. या तिन्ही पिकांसाठी अंतिम मुदत १५ डिसेंबर आहे, असे कृषी विभागाने सांगितले.




### विभागनिहाय अर्ज संख्या

कोकण – ६, नाशिक – ७,९४६
पुणे – ४३,०२७, कोल्हापूर – १९,६४९
संभाजीनगर – ७९,३९९
लातूर – १,३७,००१,अमरावती – ३७,४५२
नागपूर – १,५१९,एकूण – ३,२६,१६८

### फळपीक योजनेमध्ये २ लाख १३ हजार अर्ज

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत आंबिया बहार (रब्बी) मध्ये आतापर्यंत २ लाख १३ हजार ६५६ अर्ज प्राप्त झाले आहेत. गेल्या वर्षी २ लाख ३५ हजार ७२५ अर्ज आले होते. काजू, संत्रा व आंबा (कोकण विभागासाठी) फळपीक विमा योजनेत सहभाग घेण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर आहे. आंबा पिकासाठी कोकण विभाग वगळून इतर जिल्ह्यांसाठी ३१ डिसेंबर व डाळिंब पिकासाठी १४ जानेवारी २०२६ ही अंतिम मुदत आहे.

# मेंथी पिकातून अधिक उत्पादन घेण्यासाठी हे करा



शेतकरी आता पारंपारिक शेती सोडून आधुनिक शेतीचा अवलंब करून शेतीतून अधिक नफा मिळवत आहेत. पाहिले तर या पिकांची मागणी देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठेत बऱ्यापैकी आहे. या क्रमाने देशातील शेतकरी त्यांच्या शेतात विविध प्रकारची पिके घेत आहेत. या पिकांमध्ये मेंथा पिकाचाही समावेश होतो, जो शेतकऱ्यांना खूप फायदेशीर आहे. अलीकडेच कृषी तज्ज्ञांनी मेंथी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण सल्ला दिला आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत अधिक नफा मिळू शकेल.


मेंथी पिकावर होणाऱ्या रोगांपासून संरक्षण कसे करावे : रोगापासून संरक्षण : मेंथी ही पुदिन्यासारखी दिसणारी वनस्पती आहे, जी अनेक कामांसाठी वापरली जाते. मेंथी पिकाच्या वेळी शेतकऱ्यांनी दीमकांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी. कारण या पिकावर दीमकाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता खूप जास्त आहे. जर दीमक एकदा पिकावर प्रादुर्भाव करत असेल तर ते संपूर्ण पीक खराब करू शकतात. याला प्रतिबंध करण्यासाठी शेतकऱ्यांनी पिकावर २.५ लिटर क्लोरपायरीफॉस प्रति हेक्टरी फवारणी करावी. याशिवाय केसाळ सुरवंट देखील मेंथी पिकावर प्रादुर्भाव करतात ज्यामुळे पिकाची पाने नष्ट होतात. या किडीपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी ५०० एम. डायक्लोरव्हास ७००-८०० लिटर पाण्यात विरघळवून पिकावर पूर्णपणे फवारणी करावी. मेंथी पिकाची योग्य काळजी न घेतल्याने मेंथीच्या पानांवर तपकिरी रंगाचे डाग पडतात. हे डाग मेंथाच्या पानांचा नाश करतात. या रोगामुळे पाने पिवळी पडू लागतात व सुकून पडतात. हे टाळण्यासाठी शेतकऱ्याने २ किलो मॅन्कोझेब ७५ डब्ल्यूपी ८००-१००० लिटर पाण्यात विरघळवून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

मेंथी पानांची सुरक्षितता : मेंथा पिकाची योग्य काळजी न घेतल्याने मेंथीच्या पानांवर तपकिरी रंगाचे डाग पडतात. हे डाग मेंथाच्या पानांचा नाश करतात. या रोगामुळे पाने पिवळी पडू लागतात व सुकून पडतात. हे टाळण्यासाठी शेतकऱ्याने २ किलो मॅन्कोझेब ७५ डब्ल्यूपी ८००-१००० लिटर पाण्यात विरघळवून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

रोपे लावताना या गोष्टी लक्षात ठेवा : मेंथी पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्याने लागवड करताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. उदाहरणार्थ, प्रथम झाडाला ०.१ टक्के कार्बेन्डाझिमच्या द्रावणात सुमारे १५-२० मिनिटे बुडवा. त्यानंतरच शेतात रोप लावावे. असे केल्याने पिकाची वाढ चांगली होते आणि रोगाची शक्यताही कमी होते.

# गाय – म्हशीच्या चाऱ्यात 'लाल शेवाळ' मिसळा, दूध उत्पादन दुप्पट

गायी आणि म्हशींच्या संगोपनासाठी आणि देशातील दुधाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार दुधावर अनुदान देखील देते. असे असतानाही पशुपालकांना दूध बचतीतून पाहिजे तेवढा नफा मिळत नाही. चाऱ्याच्या दरात झालेली वाढ हेही यामागे एक प्रमुख कारण आहे. आज फार कमी प्रमाणात मोकळी कुरणे उरली आहेत, अशा स्थितीत पशुपालकांना हिरवा चारा विकत घेऊन जनावरांना द्यावा लागतो. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याची किंमत वाढल्या आहेत. अशा स्थितीत पशुपालक शेतकरी जनावरांना खास पशुखाद्य देऊ शकतात ज्यामुळे जनावरांच्या दुधाचे प्रमाण तर वाढेलच शिवाय पर्यावरणातील मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. व यातून पशुपालकांचे उत्पन्न देखील दुप्पट होईल.



मिथेन वायू ग्लोबल वॉर्मिंगसाठी कारणीभूत : रवंथ करणाऱ्या गायी म्हशीमुळे सर्वात जास्त मिथेन वायू उत्सर्जित होते असे मानले जाते. पशुपालनात ही एक मोठी समस्या आहे. तज्ज्ञांच्या मते, पशुपालक शेतकऱ्यांनी त्यांच्या दुभत्या जनावरांच्या चाऱ्यात काही बदल केले तर मिथेन वायूचे उत्सर्जन काही प्रमाणात कमी होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते गायी आणि म्हशी त्यांच्या तोंडातून सर्वाधिक मिथेन वायू उत्सर्जित करतात. ते ज्या प्रकारचा चारा खातात ते चघळण्याच्या पहिल्या टप्प्यात जास्त मिथेन वायू तयार करतात, आणि ते वातावरणात सोडतात. यामुळे वातावरणातील मिथेन वायूचे प्रमाण वाढते जे ग्लोबल वॉर्मिंग वाढवण्यास मदत करते. अशा परिस्थितीत जनावरांच्या आहारात 'लाल शेवाळ' वापरून मिथेन वायू निर्मिती कमी करता येते. लाल शेवाळापासून तयार केलेले खाद्य जनावरांना दिल्याने दुधाचे प्रमाणही वाढते.

लाल शेवाळपासून अन्न : पशुपालक बाजारातून लाल शैवाल असलेले खाद्य विकत घेऊ शकतात. जनावरांचा चारा बनवताना रेड अल्गी किती प्रमाणात घालायचे याची काळजी घ्यावी. जनावरांच्या आहारात आवश्यकतेपेक्षा जास्त लाल शेवाळ टाकल्यास त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. उदाहरणार्थ, कट फीडमध्ये किती लाल शैवाल घालायचे हे लक्षात ठेवणे फार महत्वाचे आहे.

तुम्ही बाजारातून पशुखाद्य विकणाऱ्या दुकानातून लाल शैवाल खाद्य विकत घेतल्यास, पशुखाद्य आणि त्याच्या वापराच्या पद्धती संबंधित सूचनाही त्याच्या पॅकेटमध्ये लिहिलेल्या सूचनांनुसार तुम्ही पशुखाद्य तयार करू शकता.

दुप्पट नफा कसा मिळवायचा?

जर पशुपालकांनी लाल शैवाल असलेले विशेष पशुखाद्य विकत घेतले, तर फीड पॅकेटमध्ये नंबर असलेला एक कोड दिसतो. हा कोड कंपनीच्या ॲपवर जाऊन सबमिट करावा लागेल.

या संख्यात्मक संहितेवरून हे कळते की पशुपालकांनी आपल्या जनावरांना किती लाल शैवाल खायला दिले आहे, ज्यामुळे मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे. त्याच्या मदतीने, पशुपालकाने किती मिथेन वायू उत्सर्जित होण्यापासून रोखला आहे हे देखील समजेल. त्याच आधारावर पशुपालकांना क्रेडिट क्रमांक मिळेल. यानंतर, पशुपालक या क्रमांकांची विक्री करून रोख नफा देखील मिळवू शकतात.

अशा परिस्थितीत जनावरांच्या दुधाची विक्री करून आणि लाल शेवाळयुक्त खाद्य असलेला आहार जनावरांना देऊन शेतकरी दुप्पट कमाई करू शकतात.

# कारले लागवड तंत्रज्ञान

कारल्याची मागणी बाजारात नेहमीच दिसून येते. यामध्ये व्हिटॅमिन ए, बी आणि सी चांगल्या प्रमाणात आढळतात. आयर्न, मँगनीज, कॅरोटीन, पोटॅशियम, मॅग्नेशियम, बीटाकॅरोटीन, ल्युटीन, झिंक इत्यादी अनेक पोषक तत्वे कारल्यामध्ये आढळतात, जे अनेक आजारांपासून दूर ठेवण्यास मदत करतात. कारल्याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते, कारण त्यात औषधी गुणधर्म असतात. त्याची बाजारपेठेत किंमतही चांगली आहे, कारल्याची लागवड करून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात.

लागवडीसाठी योग्य माती : कारल्याच्या लागवडीसाठी वालुकामय चिकणमाती सर्वात योग्य मानली जाते. याशिवाय नदीच्या काठावर आढळणारी गाळाची मातीही कारल्याच्या लागवडीसाठी चांगली मानली जाते.

लागवडीसाठी योग्य तापमान : कारल्याच्या लागवडीला जास्त तापमान लागत नाही. पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी २० अंश ते ४० अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. याशिवाय कारल्याच्या शेतात ओलावा राखणे देखील खूप महत्वाचे आहे.

कारल्याच्या सुधारित जाती : भारतामध्ये कारल्याच्या अनेक सुधारित जाती उपलब्ध आहेत, शेतकरी त्यांच्या क्षेत्रानुसार या जातींची निवड करतात. जर आपण कारल्याच्या त्या सुधारित जातींबद्दल बोललो जे अधिक लोकप्रिय आहेत, तर त्यात समाविष्ट आहेत – पुसा स्पेशल, हिसार सिलेक्शन, कल्याणपूर बारमाही, कोईम्बतूर लवंग, पुसा टू सीझनल, पंजाब बिटर गॉर्ड -१, पंजाब -१४, सोलन ग्रीन, अर्का हरित, पुसा हायब्रीड-२, पुसा औषधी, सोलन सफेद, प्रिया को-१, -१, कल्याणपूर सोना आणि पुसा शंकर-१ इत्यादी सुधारित वाणांचा समावेश आहे.



लागवडीसाठी योग्य वेळ : शेतकरी वर्षातील १२ महिने कारल्याची लागवड करू शकतात, कारण शास्त्रज्ञांनी अशा संकरित जाती विकसित केल्या आहेत ज्याची लागवड शेतकरी वर्षभर करू शकतात. उन्हाळ्यात जानेवारी ते मार्च या कालावधीत, मैदानी भागात, पावसाळ्यात जून ते जुलैपर्यंत, तर डोंगराळ भागात कारल्याची पेरणी मार्च ते जूनपर्यंत करता येते.

कारल्याच्या शेतात सिंचन : कारल्याच्या झाडाला थोडेसे पाणी द्यावे लागते, त्याच्या शेतात ओलावा टिकवून ठेवणे फार महत्वाचे आहे. ही ओलावा टिकवून ठेवण्यासाठी शेतकरी हलके सिंचन करू शकतात. याशिवाय पिकामध्ये फुले व फळे येण्यास सुरुवात झाल्यावर हलके पाणी द्यावे. मात्र सिंचन करताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी लागते. कडबा शेतात पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा पीक खराब होऊ शकते.

तण काढणे : शेतकऱ्यांनी पिकाच्या सुरवातीला कारल्याची खुरपणी करावी. या रोपासोबत अनेक अनावश्यक इतर झाडे वाढतात, त्यामुळे अशा परिस्थितीत तुम्ही शेतात तण काढावे आणि इतर झाडे काढून टाकावीत. झाडाला सुरुवातीपासूनच तणमुक्त ठेवल्यास कडब्याचे चांगले पीक येते.

कारल्याची काढणी : कारल्याचे पीक पेरणीनंतर सुमारे ६० ते ७० दिवसांत तयार होते. शेतकऱ्यांनी त्याची फळे लहान व मऊ असतानाच काढावीत. काढणी करताना लक्षात ठेवा की कारल्याच्या देठाची लांबी २ सेमी पर्यंत असावी, असे केल्याने फळ जास्त काळ ताजे राहते. तुम्ही नेहमी सकाळीच कापणी करावी.

लागवडीत खर्च व नफा : एकरी कारल्याची लागवड करण्यासाठी शेतकऱ्याला सुमारे ३० हजार रुपये खर्च येतो. एक एकर जमिनीवर कडबा पिकाची लागवड केल्यास सुमारे ५० ते ६० क्विंटल उत्पादन मिळू शकते. एक एकर शेती करून शेतकरी सुमारे २ ते ३ लाख रुपयांचा नफा कमवू शकतात.




### महत्वाच्या घटना

१७३१ : चीनच्याबीजिंगला झालेल्या भूकंपात एक लाख लोक मरण पावले होते.
१७५९ : दिल्लीचा सम्राट आलमगीर द्वितीय च्या मंत्र्याची हत्या झाली होती.
१८७२ : हॅमिल्टन क्रिसेंट, ग्लासगो येथे स्कॉटलंड व इंग्लंड यांच्यामधे जगातील पहिला आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामना खेळण्यात आला.
१९१७ : कलकत्ता येथे 'आचार्य जगदीश चंद्र बोस इन्स्टिट्युट' ची स्थापना
१९३९ : सोव्हिएत युनियन ने सीमा विवादामुळे फिनलंड वर आक्रमण केले होते.
१९६१ : मध्ये सोव्हिएत युनियन ने कुवैत च्या संयुक्त राष्ट्राच्या अर्जाचा विरोध केला होता.
१९६५ : प्रसिद्ध व्यंगचित्रकार शंकर पिल्लई यांनी दिल्लीला बाहुल्यांच्या संग्रलायाची स्थापना केली होती.
१९६६ : बार्बाडोसला (युनायटेड किंगडमपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९९४ : आजच्या दिवशी सोमालिया च्या जवळ आशि लॉरो नावाचे एक पर्यटक जहाज आग लागून समुद्रात बुडाले होते.
१९९५ : 'ऑपरेशन डेझर्ट स्टॉर्म' संपल्याची अधिकृत घोषणा
१९९६ : ख्यातनाम साहित्यिक पु. ल. देशपांडे यांना महाराष्ट्र सरकारचा पहिला 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' प्रदान. हा महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च पुरस्कार आहे.
१९९८ : एक्सॉन आणि मोबिल यांच्यामध्ये ७३.७ बिलियन अमेरिकन डॉलर्स चा करार झाल्यामुळे एक्सॉनमोबिल ही जगातील सर्वात मोठी कंपनी तयार झाली.
२००० : मध्ये अल गोर यांनी पुन्हा मतमोजणीची अपील केली होती.
२००० : मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीची कलाकार प्रियांका चोपडा मिस वर्ल्ड बनली होती.
२००० : पाच अंतराळवीर आणि महाकाय सौरपंखे घेऊन 'एन्डेव्हर' या अंतराळयानाने फ्लोरिडातील केप कॅनव्हेरॉल येथून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने उड्डाण केले.
२००२ : आय सी सी ने झिम्बाब्वे मध्ये न खेळणाऱ्या देशांवर कारवाई होऊ शकते अशी घोषणा केली.
२००४ : बांगलादेश च्या लोकसभेत महिलांसाठी ४५ टक्के राखीव जागेचे विधायक मंजूर झाले होते.
२००८ : मध्ये आतंकवादी हल्या नंतर सरकारने फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी ला स्थापन करण्याचा निर्णय घेतला.
२०१३ : पाकिस्तान ने सिक्रेट पाकिस्तान नावाचा माहितीपट दाखविल्यामुळे विश्वविख्यात मिडिया बीबीसी च्या प्रसारणावर स्थगिती आणली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०२ : ऑटो व्हॉन गॅरिक – वातावरणाबाबत मूलभूत सिद्धांत मांडणारे जर्मन पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २१ मे १६८६)
१७६१ : स्मिथसन टेनांट – हिरा हा कार्बनच असतो हे प्रयोगावरुन सिद्ध करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ. त्यांनी ऑस्मिअम व इरिडिअम या मूलद्रव्यांचा शोध लावला. त्यांच्या सन्मानार्थ तांब्याच्या एका धातुकाला टेन्नाटाईट (१२४१३) असे नाव दिले आहे. (मृत्यू: २२ फेब्रुवारी १८१५)
१८५८ : जगदीशचंद्र बोस – नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ, वनस्पतींमधील प्रतिक्षिप्त क्रियांवर मूलभूत संशोधन (मृत्यू: २३ नोव्हेंबर १९३७)
१८३५ : मार्क ट्वेन – विख्यात अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार (मृत्यू: २१ एप्रिल १९१०)
१८७४ : विन्स्टन चर्चिल – दुसऱ्या महायुद्धकाळातील ब्रिटनचे पंतप्रधान, साहित्यिक, वृत्तपत्रकार, थोर राजकारणी आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २४ जानेवारी १९६५)
१९१० : कविवर्य बा. भ. बोरकर ऊर्फ 'बाकीबाब' (मृत्यू: ९ जुलै १९८४)
१९३१ : भारतीय इतिहासकार रोमिला थापर यांचा जन्म.
१९३५ : आनंद यादव – लेखक
१९३६ : भारतीय पार्श्वगायक सुधा मल्होत्रा यांचा जन्म.
१९४४ : हिंदी लेखिका मैत्रेयि पुष्पा यांचा जन्म.
१९४५ : वाणी जयराम – पार्श्वगायिका
२०१० : राजीव दिक्षीत – सामाजिक कार्यकर्ता (जन्म: ३० नोव्हेंबर १९६७).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०० : ऑस्कर वाईल्ड – आयरिश लेखक व नाटककार (जन्म: १६ आक्टोबर १८५४)
१९०९ : इंग्रजी आणि बंगाल मध्ये लिखाण करणारे प्रसिध्द लेखक रमेश चन्द्र दत्त यांचे निधन.
१९१५ : मध्ये प्रसिद्ध तेलगु साहित्यकार गुरुजादा अप्पाराव यांचे निधन.
१९६७ : राजीव दिक्षीत – सामाजिक कार्यकर्ता (मृत्यू: ३० नोव्हेंबर २०१०)
१९७० : निना रिकी – जन्माने इटालियन असलेल्या फ्रेंच फॅशन डिझायनर (जन्म: १४ जानेवारी १८८३)
१९८९ : कॅमेरून देशाचे पहिले अध्यक्ष अहमदिऊ आहिदो यांचे निधन. (जन्म: २४ ऑगस्ट १९२४)
१९९५ : वामनराव कृष्णाजी तथा वा. कृ. चोरघडे – साहित्यिक लघुकथा, लोककथा, बालवाङ्मय, चरित्र, अनुवाद), विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक (जन्म: १६ जुलै १९१४)
२००१ : मध्ये जगप्रसिद्ध संगीतकार जॉर्ज हॅरिसन याचं निधन.
२०१२ : इंदर कुमार गुजराल – भारताचे १२ वे पंतप्रधान (जन्म: ४ डिसेंबर १९१९)
२०१४ : अरुणाचल प्रदेशचे वे७ मुख्यमंत्री जर्बोम गॅमलिन यांचे निधन. (जन्म: १६ एप्रिल १९६१).

रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

# अहिल्यानगर जिल्ह्यातील आणखी एक मल्टीस्टेट पतसंस्था अडचणीत

## ठेवीदारांचे अडकले ५.६३ कोटी !

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

अहिल्यानगर जिल्ह्यातील आणखी एक मल्टीस्टेट पतसंस्था अडचणीत आली आहे. भगवानबाबा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या श्रीरामपूर शाखेत ४९ ठेवीदारांच्या ५ कोटी ६३ लाख ४९ हजार ७६४ रुपयांच्या ठेवी अडकल्या असून या ठेवींची रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याने संस्थेच्या संचालक मंडळावर २६ नोव्हेंबर रोजी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत ठेवीदार सौ.निकिता सचिन पवार (रा.केसापूर, ता.राहुरी) यांनी फिर्याद दिली. भगवानबाबा मल्टिस्टेटच्या नगर शहरासह शेवगाव, श्रीरामपूर, पाथर्डी तसेच शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी, बोधेगाव येथे शाखा आहेत. श्रीरामपूर शाखेत फिर्यादी निकिता पवार यांच्या पतीच्या नावे सन २०२३ मध्ये २ कोटी ९९ लाख ५५ हजार रुपयांच्या ठेवी ठेवल्या होत्या. या ठेवींची मुदत संपल्यावर आणि फिर्यादी यांच्या कुटुंबीयांना पैशांची आवश्यकता असल्याने त्या संस्थेत ठेवी आणि त्यावरील व्याजाची रक्कम मागण्यासाठी गेल्या असता ठेवी परत करण्यास टाळाटाळ सुरू करण्यात आली. पवार यांनी संस्थेच्या चेअरमनसह संचालक मंडळाशी अनेक वेळा संपर्क साधून ठेवीच्या रकमेची मागणी केली. मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत वेळ मारून नेली. संस्थेकडून ठेवीची रक्कम तसेच व्याज मिळत नसल्याने ठेवीदार हवालदिल झाले. त्यानंतर त्यांनी अधिक माहिती घेतली असता या शाखेत अजून इतर ४८ ठेवीदारांच्या २ कोटी ६३ लाख ९४ हजार ७६४ रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत. अशा फिर्यादीसह ४९ ठेवीदारांच्या ५ कोटी ६३ लाख ४९ हजार ७६४ रुपयांच्या ठेवी देण्यास संचालक मंडळाने टाळाटाळ केल्याने आपली फसवणूक झाली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अखेर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी ठेवीदारांचे अर्ज, ठेवीच्या पावत्या व इतर कागदपत्रांची चौकशी केल्यावर सौ.निकिता पवार यांची फिर्याद नोंदवून घेत गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये संस्थेच्या चेअरमन मंदाकिनी रंगनाथ वैद्य, संचालक मयूर रंगनाथ वैद्य, नितीन सोपानराव तुपे, शांतीसिंग नागनाथ साखरे, राम लक्ष्मण पोपळघट, किशोर अनिल सुरवसे, वैशाली मयूर सुरवसे, व्यवस्थापक प्रवीण म्हसे या ८ जणांचा समावेश आहे.

## जिल्ह्यात बालविवाह मुक्तीचा नाद



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

बालविवाह निर्मूलनाच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने चांगले पाऊल टाकत १०० हॉटस्पॉट गावांमध्ये एकाचवेळी बालविवाह मुक्तीची शपथ देऊन जनजागृतीला नवी चालना दिली. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली २७ नोव्हेंबर २०२४ रोजी सुरू करण्यात आलेल्या बालविवाह मुक्त भारत प्रकल्पाला आज एक वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने हा उपक्रम राबविण्यात आला. २०३० पर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्हा पूर्णपणे बालविवाहमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

ज्या गावांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे, अशा १०० गावांची निवड हॉटस्पॉट म्हणून करण्यात आली. या गावांमध्ये शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, शाळा सल्ला समिती, महिला बचत गट, तसेच अंगणवाडी सेविका-मदतनीस यांनी एकत्र येत सामूहिकरित्या शपथ घेतली. गावातील प्रत्येक स्तरावरून मिळालेल्या प्रतिसादामुळे ही मोहीम प्रभावी ठरत असल्याचे शाळांचे मुख्याध्यापक आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींनी सांगितले. या उपक्रमासाठी जिल्हा परिषद आयसीडीएस, शिक्षण, पंचायत, आरोग्य व महिला-बालविकास विभागांना युनिसेफ व एसबीसी-३ यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षण विभागाचे ज्ञानेश्वर रोडगे, बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे, युनिसेफ/एसबीसी-३ चे जिल्हा प्रकल्प समन्वयक बाळकृष्ण साळुंके, पंचायत विभागाचे सहाय्यक सुरेश कापसे व विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सामाजिक समता व संविधानिक मूल्यांची नव्या पिढीत रुजवण काळाची गरज - अविनाश पायके



बीड। प्रतिनिधी

संविधान दिन हा केवळ सरकारी अधिकारी किंवा शाळांपुरता मर्यादित कार्यक्रम राहू नये. व्यापारी, शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी प्रत्येकाने संविधानाचे पालन करण्याचा संकल्प करून समाज अधिक समतोल, सुरक्षित व प्रगत करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन बीड शहरातील रिअल इस्टेट उद्योगाचे प्रमुख अविनाश पायके यांनी चंदूलाल सराफ दुकानात संविधान दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणासाहेब शेळके, पत्रकार मिथुन जोगदंड, आत्माराम वावळकर, गफार देशमुख, तसेच मॅनेजर अभिजीत अडाणे, प्रसिद्ध उद्योजक विजयकुमार बियाणी, प्रा. मनोहर पायके, अर्जून जंवजाळ, लिपिक उज्वला वाघमारे, राहुल वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

बीड शहरातील चंदुकाका सराफ दुकानात गुरूवार, दि. २७ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास संविधान दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव क्रांतीसूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे आणि संविधान प्रस्ताविकेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर निवडक मान्यवरांनी संविधान दिनाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अध्यक्षीय मार्गदर्शन करताना अविनाश पायके साहेब म्हणाले की, बीड शहरातील व्यापारी क्षेत्रात प्रथमच संविधान दिन इतक्या शिस्तबद्ध, भव्य पद्धतीने साजरा होताना पाहून निश्चितच अभिमान वाटतो. सोन्याच्या दुकानात संविधान दिन साजरा करून चंदूलाल सराफ यांनी सामाजिक समता व संविधानिक मूल्यांची नव्या पिढीत रुजवण केली आहे, हा उपक्रम शहरासाठी एक आदर्श आहे. हा त्यांचा आदर्श शहरातील इतर व्यावसायिकांना घ्यावा आवाहन केले. करत संविधान दिन हा केवळ सरकारी अधिकारी किंवा शाळांपुरता मर्यादित कार्यक्रम राहू नये. व्यापारी, शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी प्रत्येकाने संविधानाचे पालन करण्याचा संकल्प करून समाज अधिक समतोल, सुरक्षित व प्रगत करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन प्रत्येक भारतीयांना केले. तसेच आयोजक, कर्मचारी, वक्ते व उपस्थित मान्यवरांचे आभार मानत संविधान रक्षणासाठी जागरूकता, एकात्मता आणि सामाजिक समतेची गरज अधोरेखित केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुपरवायझर कृष्णा राठोड, कमलेश श्रीवास्तव, तसेच सेल्स मॅन संकेत पंडित, कोमल शिरसागर, अक्षय टाक, सुरज पंडित, अनिकेत वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला निवडणूक कामाचा आढावा

लातूर। प्रतिनिधी

जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी रेणापूर नगर पंचायतीच्या सविवित्रिक निवडणूकीच्या निवडणूक कामाचा आढावा घेतला. स्ट्राँग रूम व श्रीराम विद्यालय येथील मतदान केंद्रास भेट देऊन तेथील सोयी सुविधांची माहिती घेतली व कांही महत्वाच्या सूचना केल्या. नागरीकांनी शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले.

या ठिकाणी गावातील नागरिक विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत मतदार जागृती कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत थोरात, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन भुजबळ , जिल्हा प्रशासन अधिकारी अजितकुमार ढोके, गटविकास अधिकारी सुमित जाधव, डीवायएसपी चौधर, पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, स्वीप पथक प्रमूख कृष्णा भराडीया आदींची उपस्थिती होती. महादेव बन यांनी मतदार जागृतीचे गीत सादर केले अमृतेश्वर स्वामी यांनी सर्व मतदारांना प्रतिज्ञा दिली. मतदान हा सर्वश्रेष्ठ अधिकार असून निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे सर्व नागरिक बंधू-भगिनींनी शंभर टक्के मतदान करून लोकशाही यशस्वी करण्यासाठी योगदान दिले पाहिजे असे सांगून नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये मतदार जागृती पथकाने केलेल्या कामाचे कौतुक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केले. त्यांनी नागरीक महिला मतदार व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांच्या हातामध्ये मतदार जागृतीचे फलक दिसत होते मतदान करण्याचे आवाहन करणाऱ्या घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या. सुंदर रांगोळी व शंभर टक्के मतदान करण्याच्या संकल्पमुळे व मतदार जागृती पथकाच्या नगरपंचायत कार्यक्षेत्रातील वाडी वस्ती तांडा येथील जनजागृतीमुळे मतदानाचा टक्का वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मतदार जागृती पथकाचे सदस्य अमृतेश्वर स्वामी यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी नागरिक यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीप सहाय्यक पथक प्रमूख सुदर्शन लहाने, समन्वयक संजय देशपांडे, प्राचार्य सिध्द-'श्वर मामडगे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, स्वीप सदस्य मंगेश सुवर्णकार, अमृतेश्वर स्वामी, महादेव बन, सुरेखा चंदेले, प्रा भरत धायगुडे श्रीराम विद्यालय रेणापूर व नगर पंचायत रेणापूरच्या कर्मचार्यांनी परीश्रम घेतले.

## हट्टाआडगाव रस्त्यावर भीषण अपघात दोन ठार ; एक विद्यार्थी गंभीर जखमी




परभणी । प्रतिनिधी

हट्टा ते आडगाव दरम्यान दर्शन बारजवळ रात्री साडेआठच्या सुमारास हट्टावरून बोरी सावंतकडे जाणाऱ्या दुचाकीला झिरो फाट्याकडून हिंगोलीकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार (एमएच ०६ बीव्ही १९७३) ने पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर कारने दुचाकीला तब्बल २०० मीटरपर्यंत फरफरत नेत पुढे उसाच्या ट्रॅक्टरला धडक दिली.

दुचाकीवरील जखमी तरुणाला १०८ ॲम्बुलन्सद्वारे डॉक्टर कपिल शिंदे आणि चालक जोंधळे यांनी परभणीला हलवले. घटनास्थळी हट्टा पोलिसाचे कासले यांनी वाहतूक सुरळीत केली. अपघातात जखमी झालेल्या अरुण सुनील सुर्वे (२०) याचा परभणीहून नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. तर ओंकार गणपत बाराहाते (२०, रा. हट्टा) यांचा परभणी येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. किशोर धोंडीबा साव (२०, रा. बोरी सावंत) हे गंभीर असून त्यांच्यावर नांदेड येथे उपचार सुरू आहेत. सदरील तिघेही परभणी येथील महाविद्यालयात डी. फार्मसीचे शिक्षण घेत होते. त्यांनी हट्टा येथे येऊन पोलीस भरतीसाठी ऑनलाइन फॉर्म भरला होता. रात्री उशीर झाल्याने बोरी सावंत येथील मित्राला दुचाकीवरून सोडण्यासाठी जात असताना हा अपघात झाला. तिघेही जिवलग मित्र होते. अपघातानंतर कारचालकाने दुचाकी दूरपर्यंत फरफरत नेत उसाच्या ट्रॅक्टरला धडक दिली आणि नंतर गाडी सोडून पळ काढला. हट्टा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. एका मित्राला मुखाग्नी दिल्यानंतर त्याच वाटेने दुसऱ्या मित्राचे प्रेत नेले जात असल्याचे हृदयद्रावक दृश्य पाहून अनेकांचे डोळे पाणावले. हट्टा गावातील दोन तरुणांचे निधन झाल्याने गावात शोककळा पसरली असून बोरी सावंत येथील किशोर हे गंभीर जखमी आहेत व त्यांच्यावर नांदेड येथे उपचार सुरू आहेत.

## जिल्ह्यात एकल वापराच्या प्लास्टिक बंदीबाबत मोहीम राबवा - जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

अहिल्यानगर । प्रतिनिधी

एकदाच वापराच्या प्लास्टिक वस्तूंवर बंदी असतानाही शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर साठवणूक, विक्री, वाहतूक आणि वापर सुरू आहे. त्यामुळे व्यापक जनजागृतीबरोबरच साठवणूकदार आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.




जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पर्यावरण समितीची बैठक पार पडली. बैठकीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी चंद्रकांत शिंदे, समितीचे सदस्य तथा हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर, प्रा. डॉ. सतीश कुलकर्णी, रविराज पाटील, अमित लाटे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.आशिया म्हणाले, जिल्ह्यातील नगरपालिका व महापालिकांनी दरवर्षी पर्यावरणावरील स्थिती अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक वर्षांपासून हा अहवाल तयार न केल्यामुळे पर्यावरणस्थितीचे अचूक आकलन होत नाही. त्यामुळे येथून पुढे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी हा अहवाल त्वरित तयार करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. बैठकीत विटभट्ट्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, नायलॉन मांजा साठवणूक, वाहतूक, विक्री व वापरावर पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कठोर कारवाई, रस्त्यावरील धूळ नियंत्रणासाठी आधुनिक धूळशोषक यंत्रांचा वापर, नदीप्रदूषण नियंत्रण, घनकचरा व्यवस्थापन, वनक्षेत्र वाढविणे, तसेच पर्यावरण संरक्षण, संवर्धन व जनजागृती उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा झाली. पर्यावरणपूरक उपक्रमांना गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधण्याचा निर्णय समितीने घेतला. याबाबत आवश्यक त्या सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# पिंपळनेर परिसरात आंदोलनाची वाढतेय धग; ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कारखानदारांनी उसाला योग्य भाव द्यावा या मागणीसाठी गत काही दिवसापासून जिल्ह्यात सर्वत्र आंदोलन चालू आहे अशा परिस्थितीत पिंपळनेर परिसरातही ऊस उत्पादक आंदोलनाच्या तयारीला लागले असून या आंदोलनाची धग वाढण्याची शक्यता आहे. यावरून सध्या तरी शेतकरी आक्रमक झाल्याचे चित्र दिसत आहे.



बीड जिल्ह्यात साखर कारखान्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे कारखान्याची संख्या वाढली असली तरी शेतकऱ्यांना मिळणारा भाव हा दिवसेंदिवस कमी होत आहे. वास्तविक पाहता वाढती महागाई आणि शेतकऱ्यांचा उत्पादनासाठी होणारा खर्च याचा हिशोब जुळविला असता उसाचा दर कारखानदारांनी वाढविण्याची गरज आहे, मात्र राजकीय कारखानदार आणि कारखानदार राजकीय पुढारी असे याचे गणित असल्याने सर्वसामान्य कष्टकरी समाजाला दोन पैसे मिळावेत ही अपेक्षा त्यांच्याकडून कधीच पूर्ण होत नसल्याचे दिसत आहे. गतवर्षी अनेक कारखान्यांनी २७०० भाव दिला होता मात्र यावर्षी बहुतांश कारखाने २४०० च्या पुढे भाव देण्यास तयार नाहीत तर दुसरीकडे पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत बीड जिल्ह्यातील कारखानदारांनी उसाला किमान चार हजार रुपये भाव द्यावा अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी माजलगाव, सह बीड, परळी, आंबेजोगाई, आष्टी, गेवराई सहअधी भागात शेतकरी आंदोलनाच्या रूपाने रस्त्यावर निघत आहेत. अनेक ठिकाणी रस्ता रोको आंदोलन झाली मात्र कारखानदार जागेवर येण्यास तयार नाहीत. जिल्हाधिकारी यांच्यासोबत कारखानदार व आंदोलन यांच्या बैठक होऊनही यावर तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन दिवसेंदिवस वाढण्याची शक्यता दिसत असताना पिंपळनेर परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी ही आक्रमक झाला आहे. या आंदोलनाची धग आता सुरू झाली असून गावागावात बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. सांडरवन, लिंबारुई, मुगाव, पाटेगाव, पिंपळादेवी, ताडसोन्ना, पिंपळनेर, नवापूर, बोरदेवी या गावात बैठकांच्या माध्यमातून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा विचार हे शेतकरी करत आहेत. ही कायम वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून याकडे कारखानदार किती गांभीर्याने पाहतात हे येणाऱ्या काळात दिसून येईल.

राजेंद्र आमटे, राजू वीर , तुकाराम दुबाले, भागवत (हानुमान) दुबाले, आण्णासाहेब दुबाले व जिजाभाऊ दुबाले तसेच बेडकुचीवाडी येथील शेतकरी रूपांगत जाधव, अशोक काशीद,माऊली जाधव,गणेश चिंचकर सांडरवन येथील शेतकरी पवनराजे दुबाले, राजेंद्र धुरवडे,लिंबरूई देवी येथील शेतकरी बालासाहेब पैठणे, सुभाषराव नांदे, अमोल दुबाले व बंडु मात्रे पाटेगाव येथील शेतकरी गोविंद कदम, वचिष्ट वाघ, विजयराजे कदम व सोमनाथ कदम पिंपळादेवी येथील शेतकरी प्रदीपराव घुमरे, शुरेश दादा घुमरे, बालाप्रसाद अवारे व विशाल घुमरे रंजेगाव येथील शेतकरी विलासराव आबुज, मुकुंद आबुज, युवराज आबुज, दिलीप आबुज आणि धनंजय आबुज या सर्व शेतकरी बांधवांची मोलाची साथ लाभली.

## गंगापूर-बोलेगाव रस्त्यावर वाघाचे दर्शन; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण



संभाजीनगर । प्रतिनिधी

गंगापूर शहरापासून अवघ्या अडीच किलोमीटर अंतरावर, बोलेगाव रोडवर शुक्रवारी मध्यरात्री साडेबारा वाजता वाघाचे दर्शन झाल्याने परिसरातील शेतकरी आणि प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बोलेगावकडे जाणारी एक कार नामकाच्या पाटाजवळील एकनाथ जाधव यांच्या शेताजवळील रस्त्यावरून जात असताना अचानक रस्त्यावर वाघ समोर आला. कार चालकाने तत्काळ शांतता राखत मोबाइलवर वाघाचे फोटो टिपले. काही क्षण रस्त्यावर उभा राहिल्यानंतर वाघ निवांतपणे दमानी चालत शेजारच्या शेतात निघून गेला.

गंगापूर तालुक्यात यापूर्वी बिबट्याचा वावर आढळत असला तरी, आता वाघाचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने गावकऱ्यांमध्ये भीती अधिक वाढली आहे. रात्रीच्या वेळेस शेतात जाणे किंवा रस्त्यावरून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी वन विभागाकडे त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. "योग्य उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल," असा इशारा त्यांनी दिला आहे.




# डीएमची गैरहजेरी पीएमच्या पथ्यावर

## धनंजय मुंडेचे परळी-गंगाखेडवर लक्ष, बीड-माजलगाव-गेवराई-धारूरकडे दुर्लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्ह्यात तीन आमदार आहेत धनंजय मुंडे पक्षातील वरिष्ठ नेते स्टार प्रचारक असले तरी त्यांना अंतर्गत विरोध स्व पक्ष यांनी केल्यामुळे त्यांनी केवळ परळी आणि गंगाखेड या दोन नगरपालिकेकडे लक्ष दिले आहे मात्र बीड गेवराई माजलगाव धारूर अंबाजोगाई याकडे साफ दुर्लक्ष केले बअसल्याचे दिसत आहे मात्र दुसरीकडे पीएम म्हणजेच पंकजा मुंडे यांनी या गैरहजेरीचा फायदा घेत जिल्ह्यात भाजपमय वातावरण केल्याचे दिसते धनंजय मुंडे यांच्या गैरहजरी चा फायदा पंकजा मुंडे यांनी पक्षासाठी चांगलाच घेतल्याचे बोलले जात आहे.**

बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेच्या निवडणूक आहेत या सहाही नगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट निवडणूक लढवत आहे पक्षाने धनंजय मुंडे यांचे स्टार प्रचारक म्हणून निवड ही केली आहे मात्र जिल्ह्यातील अंतर्गत राजकारणात सुरू असलेल्या कुरवड्यामुळे त्यांनी इतर ठिकाणी जाणे नापसंत केले यातच माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आम्हाला धनंजय मुंडे यांची सभा नको अशी जाहीर केले बीड आणि गेवराई मध्ये तर त्यांच्याच पक्षाच्या उमेदवारांनी आणि प्रमुखांनी विविध बॅनर वर धनंजय मुंडे यांचे फोटो टाळल्याचे दिसत आहे बीडमध्ये काही





### राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नुकसान

माजी मंत्री आणि पक्षाचे स्टार प्रचारक धनंजय मुंडे यांच्या संदर्भात स्थानिक पातळीवर सुरू असलेली चर्चा आणि त्यांनी या निवडणुकीकडे केलेले दुर्लक्ष पाहता याचा फटका पक्षाला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही अनेक ठिकाणी तर त्यांचे फोटो देखील लावले गेले नाहीत त्यामुळे मुंडे समर्थक रोष आहे

ठिकाणी आहेत मात्र गेवराई मध्ये धनंजय मुंडे यांचे छगन भुजबळ यांचे फोटो टाळण्याचे दिसत असल्याने त्यांनी देखील या निवडणुकीत परळी वगळता कुठेही रस दाखवला नाही मात्र त्यांच्या गैरहजेरीमध्ये त्यांच्या भगिनी भाजपा नेत्या मंत्री पंकजा मुंडे यांनी मात्र पक्षासाठी चांगला फायदा घेतल्याचे दिसत आहे निवडणुकीमध्ये त्यांनी सहा नगरपालिकेमध्ये भाजपाचे चिन्हावरील उमेदवार उभे असल्याने त्यांनी सर्व ठिकाणी सभा घेतल्याने वातावरण भाजपने करण्याचा प्रयत्न केला एक प्रकारे जिल्ह्यातील जातीवाद पाहता त्यांच्याकडे येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसत आहे जर धनंजय मुंडे सक्रिय राहिले असते तर भाजपाला रोखता आले असते राष्ट्रवादीला मिळणारी मते ही मुंडे वर प्रेम करणाऱ्या कार्यकर्ते आणि मतदारांचे आहेत हे नाकारता येणार नाही कदाचित बीड सह गेवराई धारूर माजलगाव या ठिकाणी धनंजय मुंडे यांच्या गैरहजरीचा फटका पक्षाला बसण्याची शक्यता आहे तर पंकजा मुंडे यांनी प्रचारात घेतलेले आघाडी याचा फायदा भाजपला होण्याची शक्यता नाकारता येत नाही शेवटी महायुतीमध्येच दोन्ही पक्ष असले तरी पक्षाची ताकद राज्य पातळीवर दाखवण्यासाठी भाजपने चांगली तयारी केली असल्याचे दिसत आहे त्या तुलनेत मात्र दोन्ही राष्ट्रवादी किंवा काँग्रेस यांचा फारसा प्रभाव दिसत नाही त्यालाही कारणे अशीच आहेत म्हणजेच डीएम यांची गैरहजेरी पीएम यांच्या पथ्यावर पडत असल्याचे सध्यातरी दिसत आहे.

## गेवराईकर शिवसेनेच्या पाठीशी, मतांची ताकद उभी करणार-अ‍ॅड.चंद्रकांत नवले

गेवराई । प्रतिनिधी

नगरपालिका निवडणूकीत गेवराईकर जनता शिवसेनेच्या पाठीशी मतांची ताकद उभी करणार असल्याचा विश्वास जिल्हाप्रमुख अ‍ॅड. चंद्रकांत नवले यांनी व्यक्त केला.



या पदयात्रेत शिवसेना जिल्हाप्रमुख अ‍ॅड.चंद्रकात नवले यांच्यासह गेवराई तालुकाप्रमुख उध्दव मडके, शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख रत्नमालाताई आंधळे, शहर प्रमुख मुकेश महाजन, महिला सहसंपर्कप्रमुख सुमनताई गोरे, मीराताई शिंदे, सौ.स्मिता चंद्रकांत नवले, सौ.सरिता उद्धव मडके, कविता नवले, ओमप्रकाश नरनाळे, नवनाथ गवते, बाळासाहेब खेडकर, बिभिषण मोघे यांच्यासह गेवराई शहरातील शिवसेनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी महिला, शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

शिवसेना बीड जिल्हा प्रमुख अ‍ॅड.चंद्रकांत नवले यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी गेवराई शहरात भगवे वादळ निर्माण झाले होते. शहरातील मोंढा नाका भागातून ◀◀ पान ३ वर

## ऊस दरवाढीच्या आंदोलनाला सोन्नाथाडी ग्रामपंचायतीचा पाठिंबा

माजलगाव । प्रतिनिधी

सद्या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला ऊस दरवाढ संदर्भात त्यांना समर्थ देण्यासाठी तालुक्यातील सोन्नाथडी ग्रामपंचायत ने एकमुखी पाठिंबा दिला असल्याचे उपविभागीय अधिकारी यांना कळवले सल्याचे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक आबा डक व सरपंच विनय भैया डक यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊस दरवाढीच्या मागणीसंदर्भात सुरु असलेल्या आंदोलनास सोन्नाथाडी ग्रामपंचायत बहुमताने पाठिंबा देत आहे असे आपणांस नम्र विनंतीपूर्वक कळिवण्यात येते. सद्यस्थितीत ऊस उत्पादनाचा खर्च अत्यंत वाढलेला असताना, कारखानदारांकडून कोणताही दर जाहीर करण्यात आलेला नाही.



याचा तीव्र निषेध सोन्नाथाडी ग्रामपंचायत व्यक्त करते. युवा शेतकरी संघर्ष समितीने मांडलेल्या ऊसाची पहिली ३,००० रुपये व अंतिम बिल ४,००० रुपये या योग्य व न्याय मागण्यांचे आम्ही एकमुखी समर्थन करीत आहोत. वरील मागण्यांवर समाधानकारक तोडगा निघत नाही तोपर्यंत ऊसतोड बंद, ऊस वाहतूक बंद आणि क्रशिंग बंद या आंदोलनात्मक कृतीस सोन्नाथाडी ग्रामपंचायत ◀◀ पान ३ वर

## प्राणीमित्रांची तत्परता : जखमी हरीन वन विभागाकडे सुपूर्द

पाटोदा । प्रतिनिधी

अनपटवाडी परिसरात आज सकाळी एका पाडस हरणाला जीवावर बेतणारी वेळ आली होती. रानटी कुत्र्यांच्या हल्ल्यातून जीव वाचवण्यासाठी धावत असताना ते पाडस थकून जमिनीवर कोसळले. ही बाब लक्षात येताच स्थानिक प्राणीमित्र तत्काळ मदतीस धावून आले.

प्राणीमित्रांनी पाडस हरणाला सुरक्षित उचलून घरी आणले व त्याची काळजी घेतली. त्यानंतर शनिवारी प्राणीमित्र गणेश खाडे व गणेश जायभाय यांच्या सोबत आम्ही वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. वन अधिकारी शहादेव पवार यांच्या उपस्थितीत हरणाच्या पाडसाची वन विभागाच्या ताब्यात अधिकृत हवाली करण्यात आली. या तात्काळ कार्यवाहीमुळे पाडस हरीणाचे प्राण वाचले



असून पुढील उपचार व काळजी वन विभागामार्फत घेण्यात येणार आहे. स्थानिक प्राणीप्रेमींच्या संवेदनशीलतेचे आणि तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## रमेश काळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा पोलीस दलामध्ये गेल्या ३४ वर्षापासून कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पददन्नती झाली असून ते सध्या पाटोदा पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत त्यांच्या पदोन्नती बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

बीड पोलीस दलामध्ये गेल्या ३४ वर्षापासून कार्यरत असलेले रमेश काळे यांनी बीड शहर, बीड ग्रामीण, पिंपळनेर ,पाटोदा आदी ठिकाणी आपली कामगिरी बजावली. नुकतेच पोलीस विभागाच्या वतीने पदोन्नतीचे आदेश आले असून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. या पदोन्नती बद्दल त्यांचे मित्र परिवार, सहकारी, नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.

## भाववाढीच्या मागणीसाठी सोमवारी अन्नत्याग आंदोलन : भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून ऊसाला योग्य दर मिळावा या मागणीसाठी शेतकरी रस्त्यावर उतरले असताना शासन आणि प्रशासन मात्र झोपेचे सोंग' घेत असल्याचा आरोप शेतकरी नेते भाई गंगाभीषण थावरे यांनी केला आहे. खत, औषधे, मजुरी, जनावरांचा चारा यांसह शेतीवरील सर्व खर्च प्रचंड वाढला असताना शेतकऱ्यांच्या उत्पादनाला मात्र कौडीमूल भाव मिळत असल्याने



शेतकऱ्यांचा संताप वाढला आहे.

शासनाने कापसाची खरेदी सुरू केली असली तरी 'तांत्रिक कारणां'चा दाखला देत खरेदी अनेक दिवसांपासून बंद आहे. सोयाबीनची खरेदीही अतिशय कमी दरात केली जात असल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. परिणामी सर्व भिस्त ऊसावर असताना, ऊसाचा भाव गेल्या वर्षीच्या २७०० रुपयांवरून यावर्षी केवळ २४०० रुपयांपर्यंत खाली आल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. पश्चिम महाराष्ट्रात ऊसाला ३५०० रुपयांपासून पुढे ३७००३८०० रुपयांपर्यंत ◀◀ पान ३ वर

## सीसीआय कापूस खरेदीत शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवा

### शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (उउख) मार्फत कापूस खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडथळा, अडवणूक किंवा पिळवणूक होऊ नये, यासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देत निवेदन सुपूर्द केले. सध्या बीड विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण



जिल्ह्यातील विविध केंद्रांवर सीसीआयची खरेदी प्रक्रिया सुरू आहे. मात्र, काही खरेदी केंद्रांहून शेतकऱ्यांकडून अनावश्यक विलंब, लांब प्रतीक्षा, गुणवत्तेच्या कारणावरून अनुचित कपात, ऑनलाइन नोंदणी आणि स्लॉट बुकिंगमधील तांत्रिक अडचणी, तसेच या कारणावर खरेदी नाकारल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यांना उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. खरेदी प्रक्रियेत अन्याय किंवा अडथळे निर्माण होत असतील, तर ते तातडीने दूर केले पाहिजेत, असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी निवेदनात नमूद केले.

निवेदनात अनिलदादा जगताप यांनी खरेदी प्रक्रिया पारदर्शक व शेतकरी-हितकारक करण्यासाठी काही प्रमुख मागण्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मांडल्या आहेत सर्व ◀◀ पान ३ वर

## परळी पोलिसांनी चोरीला गेलेले अडीच लाखांचे मोबाईल केले मालकांना सुपूर्त

बीड । प्रतिनिधी

परळी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत गुन्हे प्रतिबंध व नागरिकांच्या मालमत्तेचा शोध घेण्याच्या उपक्रमांतर्गत एक महत्त्वपूर्ण कारवाई करण्यात आली असून परळी शहरातून चोरी गेलेले अडीच लाख रुपये किमतीचे ११ मोबाईल पोलिसांनी शोधून ते मालकांना सुपूर्द केले.

परळी शहर पोलीस ठाण्याचे अंतर्गत गुन्हे प्रतिबंध व नागरिकांच्या मालमत्तेचा शोध घेण्याच्या उपक्रमांतर्गत महत्वपूर्ण कारवाई करण्यात आली. पोर्टलच्या माध्यमातून हरवलेले व चोरीला गेलेले मोबाईल शोधून काढण्यात यश आले. या उपक्रमात पोर्टलवरून तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीवरून तसेच माहितीच्या आधारे परळी शहर च्या सायबर कक्षाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक अमोल शिंगणे व पोलीस अंमलदार प्रशांत शेळके यांनी या मोबाईलचा सखोल तपास करून मागील एका महिन्यात वेगवेगळ्या कंपनीचे ११ मोबाईल ज्याची किंमत दोन लाख पन्नास हजार रुपये एवढी आहे. या फोनचा शोध घेऊन जप्त



करण्यात आले. संबंधित मोबाईलच्या मूळ मालकांची ओळख व मालकी हक्काची खात्री करून दिनांक २९ नोव्हेंबर रोजी परळी शहर पोलीस ठाण्यात जप्त मोबाईल पैकी सात मोबाईल मूळ मालकांना सुपूर्त करण्यात आले. तर उर्वरित चार मोबाईल तक्रारदार पोलीस ठाण्यात हजर झाल्यानंतर खात्री करून सुपूर्त करण्यात येणार आहेत. परळी शहर पोलिसांच्या सायबर डेस्क व तांत्रिक पथकाने या कारवाईत सक्रिय सहभाग नोंदविला. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने ◀◀ पान ३ वर

## गांधी महाविद्यालयाच्या मुलींचा बास्केटबॉल संघ विद्यापीठात प्रथम

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयाच्या महिला बास्केटबॉल संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयास गौरवाचा सन्मान मिळवून दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे २३ व २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बास्केटबॉल स्पर्धेत, गांधी महाविद्यालयाच्या मुलींनी अंतिम सामन्यात देवगिरी



महाविद्यालयाचा ५७-४८ अशा गुणांनी पराभव करून विजयश्री मिळवली. संघाला प्रा. डॉ. जमीर सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले होते. विद्यापीठ स्तरावर झालेल्या या यशामुळे संघास विविध मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.या स्पर्धेत संघाच्या कु. निकीता बाबासाहेब पोकळे या खेळाडूची स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड ◀◀ पान ३ वर



## खंडोबा यात्रेनिमित्त कवडगाव येथे भव्य कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे दिनांक २७ नोव्हेंबर रोजी खंडोबा यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात्रेच्या पारंपरिक आणि धार्मिक उत्साहात रंग भरत पालखी मिरवणूक, वाघ्या-मुरळीचे कार्यक्रम तसेच जंगी कुस्ती स्पर्धांनी परिसर दणाणून गेला.

गावातील सरपंच शेख बशीर, ग्रामपंचायत ◀◀ पान ३ वर

## माजी आमदार राजेंद्र जगताप यांचे प्रिती संगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती स्थळावर अभिवादन

बीड । प्रतिनिधी

देशाचे माजी उपपंतप्रधान आणि महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या कराड येथील स्मृतीस्थळावर बीडचे माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी यशवंतरावांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन केले.

साहित्यिक, सुसंस्कृत राजकारणी, काँग्रेसचे नेते अशा विविध भूमिकातून महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी अग्रक्रमाने प्राधान्याने काम करत, आपल्या कार्यकुशलतेने महाराष्ट्राच्या विकासाचा पाया भर भक्कमपणे निर्माण करणारे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळाचे बीडचे माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी



दर्शन घेतले.शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी महाराष्ट्रात सहकारी संस्था स्थापन करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

भारत चीन युद्ध काळात भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांच्यावर संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी दिली होती. आपल्या कार्य कुशलतेने यशवंतरावांनी ती जबाबदारी देखील अत्यंत ताकदीने लीलया पूर्ण केली होती याची आठवण जगताप साहेबांना झाली. स्व. चव्हाण साहेबांनी आपल्या राजकीय जीवन प्रवासात कायम समाजहिताला प्रथम प्राधान्य देत सर्व समाज घटकांना समान न्याय देण्याचा आदर्श उभा केला असल्याचे ही जगताप यांनी नमूद केले. केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री अशा विविध पदांना त्यांनी कर्तव्यनिष्ठतेने निभावले ही त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ज्वलंत साक्ष होय. स्वर्गीय यशवंतराव हे एक शिक्षण तज्ञ म्हणूनही आपली छाप सोडण्यात यशस्वी झाले असे प्रतिपादन जगताप यांनी केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ | पान ७

# जमीन वादातून १३०० डाळिंब झाडांची कत्तल ; सख्ख्या भावाचे निर्दयी कृत्य

**शिरूर । प्रतिनिधी**

जांबुत-शरदवाडी (ता. शिरूर) परिसरात दोन शेतकऱ्यांनी कष्टाचे पीक फुलत असताना मध्यरात्रीच्या अंधारात घडलेल्या अमानुष प्रकाराने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. कोर्टात जमीन-वाटपाचा विषय प्रलंबित असतानाच सख्ख्या भावानेच दोन भावांच्या शेतातील तब्बल १३०० डाळिंब झाडे तोडून नासधूस करण्यात आली. ही झाडे शेतकरी शहाजी निवृत्ती थोरात व दिलीप निवृत्ती थोरात या दोन भावांची असून, रात्रीच्या वेळी त्यांचा सक्का भाऊ बाळू निवृत्ती थोरात व इतरांनी झाडे तोडल्या ची लेखी तक्रार शिरूर पोलीस स्टेशन येथे केली आहे. या घटनेने शरदवाडी परिसरात खळबळ उडाली आहे.



शहाजी व दिलीप थोरात यांनी चार वर्षांपूर्वी भगवा जातीची १३०० रोपे सुमारे तीन एकर क्षेत्रावर लावली होती. लाखो रुपयांचा खर्च करून ही झाडे त्यांनी मनापासून वाढवली. सध्या या डाळिंब पिकाला मोठ्या प्रमाणात फळधारणा झाली होती आणि पुढील दोन महिन्यांत काढणी अपेक्षित होती.परंतु शुक्रवारी मध्यरात्री शेतात घुसून सर्व १३०० झाडे मूळासकट तोडली, अशी धक्कादायक माहिती शेतकरी थोरात यांनी दिली. या तोडफोडीमुळे गत चार वर्षांचा परिश्रम, खर्च आणि अपेक्षित उत्पन्न याचा पूर्णपणे विनाश झाला आहे.लागवड, सिंचन, खतांची गुंतवणूक, मजूर खर्च, औषध फवारणी ते निगा या सर्वांचा विचार करता शेतकऱ्यांनी आतापर्यंत मोठे भांडवल खर्च केले होते. या सर्वाची गणना करताना अंदाजे ४० ते ४५लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे शेतकरी शहाजी आणि दिलीप थोरात यांनी सांगितले.सध्या शेतमालाला योग्य भाव नाही. कांदा, भाजीपाला यांचे दर कोसळलेले. अशातच एवढे मोठे नुकसान झाल्याने त्यांच्या आर्थिक स्थितीवर जबरदस्त परिणाम झाला आहे. सदर शेतजमिनीचा वाटपाचा विषय कोर्टात प्रलंबित आहे. न्यायालयाने अंतिम निर्णय दिलेला नसतानाही झाडे तोडून टाकणे हा न्याय व कायद्याचा अवमान ठरत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांनी थेट आरोप केला आहे की, आमचा भाऊ बाळू निवृत्ती थोरात व इतरांनी मध्यरात्री येऊन झाडांची निर्दयीपणे तोडफोड केली. ही घटना उघडकीस आल्यानंतर जांबुत-शरदवाडी परिसरातील सर्व शेतकरी व नातेवाईक संतप्त झाले आहेत. त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली की, दोषींवर त्वरित व कडक कारवाई करण्यात यावी. शेतकऱ्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी मदत द्यावी. अशा घटनांना आळा घालण्यासाठी विशेष सुरक्षा उपाय करावेत.चार वर्षे आम्ही या झाडांना लेकरांसारखी वाढवले आता फळधारणा झाली होती. तीन महिन्यात पीक हातात येणार होते. पण रात्रीच्यावेळी येऊन भावानेच निर्दयीपणे १३०० झाडे तोडली. आमचे चार वर्षांचे स्वप्न एका क्षणात संपले. असे उद्गार शहाजी व दिलीप थोरात यांनी काढले.ही घटना केवळ दोन शेतकऱ्यांचे नुकसान नाही, तर संपूर्ण शेतकरी समाजाच्या मनात भीती निर्माण करणारी आहे. जिल्हा प्रशासन, पोलीस व महसूल विभागाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी सर्व शेतकऱ्यांची मागणी आहे.

# गणपती मिरवणुकीत लेझर लाईटचा वापर, मंडळाच्या अध्यक्षाला तुरुंगवास

पिंपरी चिंचवड

गणेशोत्सव मिरवणुकीदरम्यान लेझर बीम लाईटचा वापर करणं एका मंडळाच्या अध्यक्षाला चांगलंच महागात पडलं आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत बंदी असतानाही नियम मोडल्याप्रकरणी, भैरवनाथ मित्र मंडळाचे अध्यक्ष गोपी पंढरीनाथ लोखंडे यांना न्यायालयाने दोन दिवसांचा साधा कारावास आणि १००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.




भैरवनाथ मित्र मंडळाची गणेशोत्सव मिरवणूक ४ सप्टेंबर २०२५ रोजी काढण्यात आली होती. यावेळी, पोलिसांनी स्पष्टपणे बंदी घातलेली असतानाही, मिरवणुकीत लेझर बीम लाईटचा वापर करण्यात आला. पोलिसांनी गणेश मंडळांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (इछडड) कलम १६३ नुसार लेझर लाईट न वापरण्याबद्दल नोटीस दिली होती. मात्र, मंडळाच्या अध्यक्षांनी या नोटीसकडे दुर्लक्ष केले. नियम मोडल्याबद्दल सांगवी पोलिसांनी मंडळाचे अध्यक्ष गोपी पंढरीनाथ लोखंडे यांच्यावर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २२३ नुसार गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याच्या अंतिम सुनावणीनंतर पिंपरी न्यायालयाने लोखंडे यांना दोषी ठरवले. १००० रुपयांचा रोख दंड आणि २ दिवसांचा साधा कारावास पोलिसांनी न्यायालयात मिरवणुकीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि मंडळाला देण्यात आलेली लेझर बंदीची नोटीस सादर केली होती. हे पुरावे निर्णायक ठरले. बंदी असतानाही लेझर बीमचा वापर करणे गंभीर स्वरूपाचे मानून न्यायालयाने हा कठोर निर्णय दिला आहे. मिरवणुकीमध्ये नियमांचे पालन न करणाऱ्या मंडळांसाठी हा एक मोठा इशारा मानला जात आहे.

लेझर बीम लाईट थेट लोकांच्या डोळ्यांवर पडल्यास गंभीर इजा होऊ शकते. मिरवणूक पाहणाऱ्या महिला, लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना याचा धोका असतो. विमानतळाजवळ किंवा हवाई मार्गावरील भागात लेझर बीममुळे विमानातील पायलट्सना विचलित होण्याची आणि अपघात होण्याची शक्यता असते. यामुळेच पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत यावर कठोर बंदी आहे. सार्वजनिक उत्सवांमध्ये आयोजकांनी आणि नागरिकांनी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. हे या निकालामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# पीएसीएल कंपनीद्वारे कोट्यवधींची फसवणूक; आरोपीच्या पोलिस कोठडीत ३ डिसेंबरपर्यंत वाढ

पुणे । प्रतिनिधी

पीएसीएल कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून तीन वर्षात दुप्पट रकमेचे आमिष दाखवून



फसवणूक केल्याप्रकरणातील आरोपी नितीन नारायण थोपटे याच्या पोलिस कोठडीत ३ डिसेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. पौड न्यायालयाचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सागर मोहिते यांनी हा आदेश दिला. आरोपीने सुस येथील जमीन मिळकतीची विक्री करून तब्बल २७ कोटींचा घोटाळा केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

आरोपीच्या पोलिस कोठडीची मुदत संपत आल्याने त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीने गंभीर गुन्हा केला आहे. गुन्ह्याची व्याप्ती मोठी आहे. त्याच्या साथीदार अद्याप फरार असून त्यांना अटक करायची आहे. गुंतवणुकदारांच्या रकमेतून घेतलेल्या जमिनीवर खरेदी विक्रीसाठी निर्बंध असताना देखील त्यांची कोणतीही सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता विक्री केली आहे. जमीन मिळकतीचे तुकडे पाडून सदर जमीनी सर्वसामान्य लोकांस विक्री करून त्यांची फसवणूक केली आहे.आरोपींनी संगनमत करून कंपनीचे नावे बनावट खोटे ठराव बनवुन खोटी कागदपत्रे अस्तित्वात आमून निर्बंधित केलेल्या जमीन मिळकतींची बेकायदेशीररित्या विक्री करून नफा मिळविल्या असल्याने त्यांच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील नितीन अडागळे आणि गुंतवणूकदार संघटनेच्या वतीने ड. निनाद बागमार आणि ड. चेतन फटाले यांनी केली.न्यायालयाने सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपीच्या पोलिस कोठडीत ३ डिसेंबर पर्यंत वाढ केली. पोलीस आयुक्त विनय चौबे, उपायुक्त गुन्हे शाखा डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सचिन घाटे, बारटक्के आणि सहारे यांचे पथक गुन्ह्याचा तपास करीत आहे.

# २ डिसेंबरला सुट्टी जाहीर; पुणे जिल्हाधिकाऱ्यांची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी निकालाची घोषणा होणार आहे. नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत पात्र मतदारांना मतदान करता यावे, याकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.



पुणे जिल्ह्यातील आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजुरी, जुन्नर, लोणावळा, माळेगाव बुद्रुक, मंचर, राजगुरुनगर, सासवड, शिरूर, तळेगाव दाभाडे व वडगाव मतदारसंघांत सुट्टी राहणार आहे. केंद्र व निमशासकीय कार्यालये, बँका यांनाही सुट्टी लागू असून पात्र मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. मतदार संघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामाकरिता त्या त्या मतदारसंघाच्या बाहेर असणाऱ्यांना मतदारांना देखील लागू राहणार असल्याचे देखील सांगण्यात आले आहे.

# रांजणी-आंबेगावच्या शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे थेट दिल्ली दरबारी; केंद्रीय मंत्र्यांनी दिले 'हे' मोठे आश्वासन

रांजणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यात भूसंपादनाच्या प्रक्रियेसंदर्भात अनेक अडी -अडचणी आहेत. शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा प्रश्न सोडवून त्यांना मोबदला देण्यासाठी प्रयत्न करू, अशी माहिती रस्ते परिवहन व राजमार्ग केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी नवी दिल्ली येथे दिली असल्याची माहिती भाजपा पुणे जिल्हा उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद हरिभाऊ बाणखेले यांनी दिली.

भाजपा पुणे जिल्हा उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद हरिभाऊ बाणखेले यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे केंद्रीय पर्यटन व राजमार्ग राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांची भेट घेतली. त्यांना राज्यात सध्या नॅशनल हायवेबाबत चाललेल्या कामासंदर्भातील माहिती दिली.



या भेटीमध्ये राजकीय, सामाजिक आणि चालू असलेल्या राजकीय घडामोडीबाबत बाणखेले यांनी हर्ष मल्होत्रा यांच्याशी संवाद साधला. गेल्या काही वर्षात आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात भूसंपादन करण्यात आले असून त्या भूसंपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना अपेक्षेप्रमाणे दिला गेला नाही. यासंदर्भात प्रमोद बाणखेले यांनी राजमार्ग केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांना माहिती दिली. शेतकऱ्यांना भूसंपादनाचा अपेक्षित मोबदला मिळत नसल्याचे बाणखेले यांनी मंत्री मल्होत्रा यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले. त्यावर मंत्री मल्होत्रा यांनी शेतकऱ्यांच्या अपेक्षेप्रमाणे भूसंपादनाच्या मोबदल्याबाबत लवकरच निर्णय घेऊ, असे आश्वासन दिल्याचे बाणखेले यांनी सांगितले.

# 'सरकारने धर्माचा प्रचार करणे हे संविधानविरोधी'- डॉ. सुखदेव थोरात यांचे खळबळजनक विधान

**पुणे । प्रतिनिधी**

**भारताच्या लोकशाही प्रणालीत प्रत्येकाला आपल्या धर्माचे स्वातंत्र्य असले, तरी, कोणतेही सरकार कोणत्याही एका धर्माचा प्रचार-प्रसार करू शकत नाही. हे घटनाबाह्य कृत्य असून, ते संविधानविरोधी आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांनी शुक्रवारी व्यक्त केले.अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त माजी केंद्रीय मंत्री आणि खासदार उपेंद्र कुशवाहा यांच्या हस्ते डॉ. थोरात यांना समता पुरस्कार प्रदान करण्यात आला.**



एक लाख रुपये, फुले पगडी, मानपत्र, शाल आणि स्मतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष पंकज भुजबळ, समीर भुजबळ, लक्ष्मण हाके, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, डॉ. शेफाली समीर भुजबळ, विशाखा भुजबळ, परिषदेचे कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, पुणे विभागीय अध्यक्ष प्रीतेश गवळी, शहर अध्यक्ष पंढरीनाथ बनकर, महिला अध्यक्ष मंजिरी धाडगे आणि महिला शहर अध्यक्ष वैष्णवी सातव उपस्थित होते.

महाराष्ट्रात जाती व्यवस्थेविरोधात कुणबी समाजाने मोठी चळवळ उभी केली, त्यातीलच काही घटकांचा बुद्धिभ्रम झाल्याने ते ब्राह्मणी विचारधारेला हातभार लावत आहेत. धार्मिक अवडंबर आणि कर्मकांड वाढत आहे. सरकार आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी धर्माचा उघडपणे प्रचार करत आहेत. महात्मा फुले यांना अपेक्षित परिवर्तन आजही आवाक्यात नाही, असेही डॉ. थोरात यांनी नमूद केले. म. फुले यांना अपेक्षित असलेले समाज परिवर्तन प्रत्यक्षात येण्याच्या दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी घटनेची रचना केली. मात्र, नोकरशाहीने राज्यघटनेची योग्य अंमलबजावणी न केल्यामुळे समाजातील काही घटक त्यांच्या अधिकारांपासून आजही वंचित आहेत, असे खा. कुशवाह म्हणाले.या वेळी शिवरकर, समीर भुजबळ, हाके, चाकणकर यांनी मनोगत व्यक्त केले. पंकज भुजबळ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शेफाली भुजबळ यांनी मानपत्राचे वाचन केले. बनकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी मंत्री छगन भुजबळ यांची अनुपस्थिती जाणवत होती. भुजबळ हे आजारी असल्याचे ते येऊ शकले नाहीत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी साडेसात वाजता फुलेवाड्यात येऊन दर्शन घेतले. मात्र, ते पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत.

# मतदारांच्या आधी बिबट्याचेच दर्शन; मंचरमध्ये प्रचाराचा 'फिव्हर' उतरला, उमेदवारही धास्तावले

**मंचर । प्रतिनिधी**

**मंचर शहर व परिसरात दिवसा-रात्री बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या वाढत्या दहशतीचा थेट परिणाम मंचर नगरपंचायतीच्या निवडणूक प्रचारावर होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. रात्री दहापर्यंत प्रचार करण्याची अधिकृत वेळ असली तरी प्रत्यक्षात थंडी,अंधार लवकर पडत असल्याने उमेदवार आणि कार्यकर्ते स्वतःची सुरक्षित बाळगताना दिसत आहे.**



निवडणुकीचा प्रचार रात्री उशिरापर्यंत चालत असतो. घराघर भेटी, कोपरा सभा, जनसंपर्क मोहीम या बहुतांश क्रिया संध्याकाळीनंतर अधिक जोमात होतात. पण सध्या शहराच्या प्रवेशद्वारांपासून ते उपनगरी वस्त्यांपर्यंत बिबट्याचे हालचाली वाढल्याने उमेदवार आणि त्यांच्या टीमला अंधारात रस्त्यांवर फिरणे धोकादायक वाटू लागले आहे.काही ठिकाणी संध्याकाळी आठनंतर रस्त्यांवर वर्दळ नगण्य होत असून कार्यकर्त्यांचा प्रचाराचाही उत्साह त्यामुळे कमी जाणवत आहे.गावातील मुळेवाडी रोड, जुना चांडोली रस्ता,एस कॉर्नर, डोबीमळा, सुलतानपूर रोड चिंचोटी तसेच अवसरी कॉलेज रस्ता जंगलपट्टीलगतच्या वस्त्यांमध्ये रात्री प्रचाराला जाण्यास कार्यकर्ते कचरू लागले आहेत. अनेक उमेदवारांनी आपल्या प्रचार वेळेत बदल करून सकाळ,दुपार आणि संध्याकाळी ८ वाजण्याच्या अगोदरच गाठीभेटींवर भर द्यायला सुरुवात केली आहे.

मतदानापर्यंत भीतीचे सावट

एकूणच, बिबट्याच्या सततच्या वावरामुळे मंचरमध्ये निवडणुकीचा प्रचार पारंपरिक गजबजणारा न होता संथ आणि सावधपणे चालू आहे. मतदानापर्यंत ही भीती कायम राहण्याची शक्यता असल्याने प्रशासन आणि वनविभागाकडून अधिक दक्षतेची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कवठे येमाई येथे दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील कवठेयेमाई येथे सालाबादप्रमाणे दत्तजयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दत्त जयंती महोत्सवाचे हे ५१ वे वर्ष आहे. अखंड हरिनाम सप्ताहात काकडा भजन, विनानामस्मरण, गुरुचरित्र पारायण, ज्ञानेश्वरी पारायण, अभंग वाणी, संगीत भजन, हरिपाठ, हरिकीर्तन, महाप्रसाद अन्नदान, हरी जागर, कीर्तन, या दैनंदिन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

२८ रोजी ह.भ.प. अमेय महाराज शिंदे, २९ रोजी शशिकांत महाराज राऊत, ३० रोजी ह.भ.प. ऋषिकेश महाराज चोरघे, १ डिसेंबर रोजी ह.भ.प.सुनिल महाराज झांबरे, २ रोजी ह.भ.प. गणेश महाराज जगताप, ३ रोजी ह.भ.प.सुधाकर महाराज मुळे शास्त्री, ४ रोजी ह.भ.प.भरत महाराज थोरात (श्री दत्त जन्म कीर्तन ४ ते ६) व मंगेश महाराज शिंदे यांचे कीर्तने ७ ते ९ या वेळेत होतील.याच दिवशी वैदिक पद्धतीने होम हवन होणार असून यामध्ये सर्वांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ५ रोजी विनोदाचार्य आदिनाथ महाराज लाड (सकाळी ९.३० ते ११.३०) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कवठेयेमाई ग्रामस्थ व श्री दत्त जयंती उत्सव समिती प्रयत्नशील आहेत. श्री दत्त जयंती भक्त महिमा व त्यायोगे समाज परिवर्तन होऊन सदभाव, भक्तीभाव वाढीस लागावा या उदात्त हेतूने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून लाखोंच्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहून ज्ञानदानाचा व श्रवण सुखाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. दत्त जन्म उत्सव समिती व समस्त ग्रामस्थ कवठे यांनी केले आहे.

# मुलींचे आजारपण दूर करण्यासाठी दाम्पत्याचे १४ कोटी लाटले; सगळे बँक व्यवहार समोर

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या मुलीवर उपचार करून बरे करण्याचे आमिष दाखवत कोथरूडमधील (तशवळज्ञर झरपवहरीीींज्ञरी ञ्रीर्रीव उरीश) दाम्पत्याला तब्बल १४ कोटींनी गंडवलेल्या तीन आरोपींमधून आतापर्यंत ५४ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. आरोपींच्या नावावर असलेल्या ३९ बँक खात्यांपैकी १३ खात्यांबाबतची माहिती उघड झाली असून, त्यामध्ये तब्बल १,१३९ संशयास्पद व्यवहार (तशवळज्ञर झरपवहरीीींज्ञरी ञ्रीर्रीव उरीश) आढळून आले आहेत. तसेच, या आरोपींनी फसवणुकीतून मिळवलेले सोने खासगी सावकारांकडे गहाण ठेवून सुमारे ६० लाख रुपयांचे कर्ज घेतल्याचं तपासात स्पष्ट झाले आहे.

या गुन्ह्यात वेदिका कुणाल पंढरपूरकर (वय ४१), कुणाल वैजनाथ पंढरपूरकर (वय ४२, दोघे रा. महात्मा सोसायटी, कोथरूड) आणि दीपक जनार्दन खडके (वय ६५, रा. वाडीवरे, नाशिक) यांना अटक करण्यात आली आहे. फसवणाऱ्या आणि पैसे लाटणाऱ्या वेदिकाची आई व भाऊ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी



दाम्पत्याची फसवणूक करून १४ कोटी ३९ लाख २० हजार घेतले असून, ही रक्कम त्यांनी विविध ठिकाणी फिरविल्याचे निदर्शनास आले आहे. या रकमेतून आरोपींनी काही मालमत्ता व वाहने विकत घेतलेली आहेत. या मालमत्तेचे सहा ते सात नोंदणी दस्त विशेष नोंदणी व महानिरीक्षक यांच्याकडून पोलिसांना मिळाले आहेत.

या प्रकरणातील आरोपींच्या एकूण तेरा बँक खात्यांची माहिती उघड झाल्याने तिघांनाही गुरुवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. आरोपींकडून वाहने आणि लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. आरोपींनी पैशांचा वापर कोण-कोणत्या कारणांसाठी केला याची चौकशी करण्यात येत आहे, अशी माहिती तपास अधिकारी पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांनी दिली. आरोपींनी त्यांच्या मालमत्तेची विल्हेवाट लावली असल्याची शक्यता आहे. आरोपींना सहा दिवसांची पोलिस कोठडी देण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकील प्रदीप गेहलोत यांनी केला आहे. मूळ तक्रारदारांच्या वतीने ड. विजयसिंह ठोंबरे यांनी बाजू मांडली. न्यायालयाने आरोपींना तीन डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. पुण्यात एका आयटी अभियंत्याला (खढ एप-सळपशशी) त्याच्या दोन्ही मुलींना बरं करण्याच्या आमिषाने तब्बल १४ कोटी रुपयांना भोंदू बाबाने गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शंकर महाराज त्यांच्या अंगात येतात आणि ते कोणताही आजार बरा करू शकतात, असा दावा करून या भोंदू बाबाने पीडित दांपत्याची दिशाभूल केली. दिपक डोळस असे फसवणूक झालेल्या आयटी अभियंत्याचे नाव असून, त्यांची पत्नी शिक्षक आहे. या दाम्पत्याची कोट्यावधींची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर येताच खळबळ उडाली आहे. या दांपत्याने आपल्या आयुष्यभराची बचत आणि इंग्लंडमधील घर,फार्म हाऊस देखील गमावले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीचे नाव दिपक खडके असून, त्याला त्याची शिष्या वेदिका पंढरपुरकर हिने फसवणुकीत साथ दिल्याचे समोर आले आहे.

cmyk